RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

**योगींनी प्रचार केलेले 17 उमेदवार विजयी**

पान 2 पाहा

# मराठी अक्रॉस मुंबई

संपादक- संजय मंगेश भैरे

**मुंबईत 71 हजारांहून अधिक 'नोटा'चा वापर**

पान 2 पाहा

वर्षः ९ अंक : ५२ ■ मुंबई, मंगळवार २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर '२४ मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

## विरोधी पक्ष नेत्याविना चालणार सभागृह

■ मुंबई

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे चित्र पूर्णपणे स्पष्ट झालंय. या निवडणुकीत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशी जुळवाजुळव झाली. भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीसमोर महाविकास आघाडीचा दारुण पराभव झालाय. विधानसभा निवडणुकीच्या निकालापूर्वी महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांनी मुख्यमंत्रिपदाचं स्वप्न उराशी बाळगलं होतं. पण निकालानंतर महाविकास आघाडीला विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद देखील नशिबी आलेलं नाही. विशेष म्हणजे राज्याच्या इतिहासात अशी स्थिती पहिल्यांदाच निर्माण झाली आहे.



महाविकास आघाडीतील घटक पक्ष काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) यापैकी कोणत्याही पक्षाला 20 पेक्षा जास्त जागा निवडून आणता आलेल्या नाहीत. विरोधी पक्षनेतेपदासाठी लोकसभा तसंच विधानसभेत एकूण सदस्य संख्येच्या प्रमाणात ठराविक संख्याबळाची आवश्यकता असते. त्यामुळं लोकसभा आणि विधानसभा नियमावलीनुसार एखाद्या पक्षाला विरोधी पक्षनेतेपद तेव्हाच मिळते, जेव्हा राज्यातील विधानसभेच्या एकूण जागांपैकी 10 टक्के जागा असतात. सध्या महाविकास आघाडीतील घटक पक्षांपैकी कोणत्याही पक्षाला किमान दहा टक्के जागांची मर्यादादेखील ओलांडता आली नाही. महाविकास आघाडीसाठी विरोधी पक्षनेते पदाचा मार्ग देखील बंद झालाय.

महाराष्ट्र विधानसभेत एकूण 288 जागा आहेत. त्यामुळं कोणत्याही पक्षाकडं विरोधी पक्षनेतेपदासाठी किमान 29 आमदार असले पाहिजेत. पण, महाविकास आघाडीत कोणत्याही पक्षाचे 29 आमदार विजयी झालेले नाहीत. काँग्रेसपासून शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पर्यंत कोणत्याही पक्षाला 20 पेक्षा जास्त जागा जिंकता आल्या नाहीत. महाविकास आघाडीच्या तिन्ही प्रमुख पक्षांच्या आणि अन्य लहान घटक पक्षांच्या मिळून 46 जागा मिळाल्या. पण एकाही पक्षाला 29 जागा मिळाल्या नाहीत. त्यामुळं महाराष्ट्रात महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेता पददेखील नशिबी नसल्याचं चित्र आहे.

## तरुण नेतृत्व उभारणार-शरद पवार

■ कराड

राज्यातील लोकांनी जो निर्णय दिला आहे तो आम्हाला मान्य आहे. त्याचा अभ्यास करणार आणि पुन्हा लोकांपुढे जाणार असं वक्तव्य शरद पवार यांनी केलं. यूपीतून आलेल्या आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' या प्रचाराचा मतदारांवर परिणाम झाल्याचं पवारांनी मान्य केलं. तसेच लाडकी बहीण योजनेमुळे महायुतीला मतं मिळाली असंही ते म्हणाले. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर पहिल्यांदाच त्यांनी कराडमध्ये माध्यमांना प्रतिक्रिया दिली.

लाडकी बहीण योजनेचा निकालावर परिणाम झाल्याचं दिसतंय असं शरद पवार म्हणाले. ते म्हणाले की, "महायुतीच्या विजयामध्ये लाडकी बहीण योजना हे एक कारण आहे. सत्तेत नसलो तर ही योजना बंद होईल अशी भीती महिलांना घालण्यात आल्याची अनेकांनी सांगितलं. त्यामुळे महिलांच्या मतदानामध्ये दोन टक्क्यांची वाढ झाल्याचं समोर आलं."

यूपीतून आलेल्या योगी आदित्यनाथ यांनी दिलेल्या कटेंगे तो बटेंगे घोषणेचा महाराष्ट्रात परिणाम झाला हे शरद पवारांनी मान्य केलं. ते म्हणाले की, त्यामुळे धार्मिक ध्रुवीकरण झालं आणि त्याचा फायदा महायुतीला झाला.

ईव्हीएममुळे महायुतीची सत्ता आली अशी चर्चा सुरू असताना त्यावर शरद पवारांनीही प्रतिक्रिया दिली. आपल्याकडे अजून कोणतीही अधिकृत माहिती नाही, त्यामुळे आपण यावर काहीही भाष्य करणार नाही असं शरद पवार म्हणाले.

झारखंडमधील काही सहकाऱ्यांनी त्यांना काही माहिती दिल्याचं पवार म्हणाले. ते म्हणाले की, "चार महिन्यापूर्वी हरयाणा आणि जम्मूमध्ये निवडणूक झाली. त्यावेळी जम्मूमध्ये काँग्रेसला यश



आलं तर हरयाणात भाजपला यश आलं. त्यानंतर महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये निवडणूक झाली. त्यासाठी ठरलेल्या वेळेपेक्षा एक महिना उशिरा महाराष्ट्रात निवडणूक घेतली. त्यामध्ये झारखंडमध्ये काँग्रेसला यश आलं तर महाराष्ट्रामध्ये भाजप आलं. त्यामुळे एक लहान राज्य विरोधकांना द्यायचं आणि एक मोठं राज्य घ्यायचं असं दिसतंय. त्यामुळे त्यामुळे उद्या कोणी म्हणायला नको की ईव्हीएममुळे मतदान पडलं. त्यावेळी एक राज्य तुम्हाला आलंय हेदेखील म्हणतात."

मराठा-ओबीसी वादामुळे ओबीसी एकत्र येऊन त्यांनी महायुतीला मतदान केलं का असा प्रश्न विचारल्यानंतर शरद पवार म्हणाले की, त्याचा काय परिणाम झाला याचा अभ्यास अजून केला नाही. पण मराठा-ओबीसी मतांच्या ध्रुवीकरणावर खोलात जाऊन अभ्यास करणार. ओबीसी वर्गाबद्दल आमच्या मनात वेगळी भावना नाही. ओबीसी समाजाच्या मंडल आयोगाचा निर्णय माझा आहे. आरक्षणाच्या बाबतीत देखील आम्ही निर्णय घेतला होता. ओबीसींच्या आरक्षणाच्या बाबतीत निर्णय घेतला त्याचा अध्यक्ष मी होतो.

या निवडणुकीत विरोधकांकडून पैशाचा मोठा वापर करण्यात आल्याची माहिती आपल्याला सहकाऱ्यांनी दिल्याचं शरद पवार म्हणाले. या आधी राज्यात असं कधीही झालं नव्हतं असंही शरद पवार म्हणाले.


## पंत ठरला आयपीएल इतिहासातला सर्वात महागडा खेळाडू

■ जेद्दाह

आयपीएल मेगा ऑक्शन 2025 मध्ये ऋषभ पंत आणि श्रेयस अय्यर याने धमाका केला आहे. टीम इंडियाच्या या स्फोटक खेळाडूंनी इतिहास घडवला आहे. पंत हे आयपीएल ऑक्शनच्या इतिहासातील सर्वात महागडा तर श्रेयस अय्यर दुसऱ्या क्रमांकाचा खेळाडू ठरला आहे. पंतसाठी लखनौ ने २७ कोटी रुपयांनी बोली लावली.



श्रेयसला आपल्या गोटात घेण्यासाठी 2 कोटी या बेस प्राईजपासून सुरुवात झाली. विविध फ्रँचायजींनी श्रेयसला आपल्यात घेण्यासाठी बोली लावली. मात्र श्रेयसची कामगिरी पाहता त्याला आपल्या टीममध्ये घेण्यासाठी फ्रँचायजींमध्ये चुरस असल्याने 25-25 लाखाने बोली वाढत गेली. श्रेयसची किंमत पाहता पाहता 24 कोटींच्या पार गेली. मात्र त्यानंतरही श्रेयसवर बोली लावली जात होती. बोलीदरम्यान श्रेयसचा आकडा 25 कोटींच्या पुढे गेला. श्रेयसला आपल्याकडे घेण्यासाठी उत्साही असलेल्या फ्रँचायजींनी वाढलेली किंमत पाहता बॅकफुटवर येणं पसंत केलं. मात्र सर्वात मोठी बोली ही पंजाब किंग्सने लावली होती. मात्र त्यानंतर कुणीच बोली लावली नाही. त्यामुळे कोलकाताला आयपीएलच्या 17 व्या मोसमात चॅम्पियन करणारा कर्णधार श्रेयस अय्यर हा आता पंजाब किंग्सचा भाग झाला आहे. पंजाबने श्रेयससाठी थोडेथोडके नाहीत, तर 26 कोटी 75 लाख रुपये मोजले आहेत.



सनरायझर्स हैदराबादने सर्वात मोठी 15 कोटी 75 लाखांची बोली लावत अर्शदीप सिंगला आपल्याकडे ओढलं. पण पंजाब किंग्स आपल्याकडे मोठी पर्स घेऊन बसली होती. त्यामुळे त्याला सहजासहजी सोडणार नव्हतं. मग काय आरटीएम कार्ड वापरलं आणि 18 कोटींची बोली लावली. अर्शदीप सिंगला 18 कोटी मिळाले आणि पंजाब किंग्ससोबत राहिला.

## मुख्यमंत्री भाजपचाच, शिंदेंसह अजितदादांना उपमुख्यमंत्री पद ?

■ मुंबई, दि. २५ प्रतिनिधी

राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा धुव्वा उडवत महायुतीने जोरदार मुसंडी मारली आहे. आता निवडणुकीच्या निकालानंतर सत्तास्थापनेसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. अशात महायुतीमधून भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांनी दिलेल्या वृत्तानुसार भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला मंजूरी दिली असून, शिवसेना आणि राष्ट्रवादीनेही या निर्णयला होकार दिला आहे. याचबरोबर एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असणार आहेत. "शिवसेनेला सुमारे १२ मंत्रीपदे मिळण्याची शक्यता असून, यामध्ये काही महत्त्वाच्या खात्यांचाही समावेश आहे. दुसरीकडे राष्ट्रवादीलाही जवळपास १० मंत्रिपदे मिळणार आहेत. १३२ आमदार असलेल्या भाजपाच्या वाट्याला २१ मंत्रीपदे येण्याची शक्यता आहे. गृह, अर्थ, नागरी विकास आणि



महसूल ही प्रमुख चार खाती भाजपा आपल्याकडे ठेवण्यास उत्सुक आहे. भाजपा गृह आणि अर्थ खात्यासाठी आग्रह धरू शकते," असे भाजपच्या अंतर्गत सूत्रांचे म्हणणे आहे. राज्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले. त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झालेल्या निकालात महायुतीने बाजी मारत २३० जागांवर विजय मिळवला. यामध्ये भारतीय जनता पार्टीने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ५७ जागांवर बाजी मारली. महायुतीतून सर्वात कमी जागा लढवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही ४१ जागांवर विजय मिळवला.

## संविधानातून 'समाजवादी' आणि 'धर्मनिरपेक्ष' शब्द हटणार नाहीत- सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

■ नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी एक ऐतिहासिक निर्णय दिला. 1976 मध्ये पारित झालेल्या 42 व्या दुरुस्तीनुसार संविधानाच्या प्रास्ताविकात "समाजवादी" आणि "धर्मनिरपेक्ष" या शब्दांचा समावेश करण्यात आला होता. हे दोन शब्द काढण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या याचिका न्यायालयाने फेटाळल्या आहेत.



भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने सांगितले की, संसदेची दुरुस्ती अधिकार प्रस्तावनेपर्यंत विस्तारित आहे. प्रस्तावना स्वीकारण्याच्या तारखेमुळे प्रस्तावनेत सुधारणा करण्याच्या संसदेच्या अधिकारावर मर्यादा येत नाही. या आधारे याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद फेटाळण्यात आला.

याआधी खंडपीठाने हे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे पाठवण्याची याचिकाकर्त्यांची याचिका फेटाळली होती. यापूर्वीच सरन्यायाधीश खन्ना आदेश देणार होते, परंतु काही वकिलांच्या अडवणुकीमुळे नाराज होऊन त्यांनी सोमवारी आदेश सुनावणार असल्याचे सांगितले.

खन्ना यांनी 22 नोव्हेंबर रोजी सुनावणी दरम्यान म्हटले की, भारतीय अर्थाने समाजवादी असणे हे केवळ कल्याणकारी राज्य समजले जाते. भारतातील समाजवाद समजून घेण्याची पद्धत इतर देशांपेक्षा खूप वेगळी आहे. समाजवाद हा शब्द वेगळ्या संदर्भात वापरला जातो, याचा अर्थ राज्य हे एक कल्याणकारी राज्य आहे आणि ते लोकांच्या कल्याणासाठी उभे राहिले पाहिजे आणि संधींची समानता प्रदान केली पाहिजे, असा होतो.

सीजेआय खन्ना पुढे म्हणाले की, एसआर बोम्मई प्रकरणात "धर्मनिरपेक्षता" हा संविधानाच्या मूलभूत संरचनेचा एक भाग मानला गेला आहे. यावर वकील जैन म्हणाले की, लोकांचे म्हणणे न ऐकता ही दुरुस्ती मंजूर करण्यात आली होती. ही दुरुस्ती आणीबाणीच्या काळात करण्यात आली होती आणि या शब्दांचा समावेश करणे म्हणजे, लोकांना काही विचारधारेचे पालन करण्यास भाग पाडण्यासारखे आहे. या प्रकरणी सविस्तर सुनावणीची गरज आहे. या प्रकरणाचा मोठ्या खंडपीठाने विचार करावा, असा युक्तिवाद त्यांनी केला. यानंतर सरन्यायाधीशांनी युक्तिवाद स्पष्टपणे फेटाळला.

## शिवसेना (उबाठा) विधिमंडळाच्या गटनेते पदी भास्कर जाधव
## आदित्य ठाकरेंवर संयुक्त सभागृहाचे नेते पदाची जबाबदारी

■ मुंबई

राज्यात सत्तेत आलेल्या महायुती सरकारवर काबू ठेवण्यासाठी शिवसेनेचा (ठाकरे) आक्रमक व अभ्यासू चेहरा समजल्या जाणाऱ्या भास्कर जाधव यांची गटनेते पदी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी वर्णी लावली आहे. विधानसभा आणि विधान परिषद या संयुक्त सभागृहाच्या नेते पदी आदित्य ठाकरे तर प्रतोद पदी सुनील प्रभू यांची निवड करण्यात आली आहे. सोमवारी शिवसेनेच्या (ठाकरे) आमदारांची मातोश्री निवासस्थानी महत्वपूर्ण बैठक पार पडली. दरम्यान, ठाकरे यांनी सावध भूमिका घेत, नवनिर्वाचित आमदारांकडून शपथपत्र लिहून घेतले आहेत. खासदार तथा सचिव अनिल देसाई, नेते सुभाष देसाई, संजय राऊत यांच्यासह वरिष्ठ नेते यावेळी उपस्थित होते.

विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी विरोधात महायूती अशी थेट लढत झाली. महायुती पुढे आघाडी निष्प्रभ ठरली.



राज्यात महायुतीची एकहाती सत्ता आणली. सध्या मुख्यमंत्री पदावरून महायुतीत काथ्याकूट सुरू असताना, महायुतीच्या नेत्यांकडून शिवसेना (ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार संपर्कात असल्याचा दावा केला जातो आहे. दोन वर्षापूर्वी एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे पक्ष फुटाला. याच पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी खबरदारी घेत, निवडून आलेल्या २० आमदारांची मातोश्री निवासस्थानी सकाळी ११ वाजता बैठक घेतली. विधानसभेत पक्षाची बाजू आमक्रमपणे मांडण्यासाठी विधिमंडळाच्या कायद्याचा अभ्यास असलेल्या भास्कर जाधव यांची निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व आमदारांनी एकमताने जाधव यांच्या निवडीला समर्थन दिले. पक्षप्रमुख यांचा निर्णय सर्व आमदारांना बंधनकारक राहिली, या संदर्भातील हमी पत्र यावेळी लिहून घेण्यात आले. दरम्यान, विधानसभेतील यशावर चर्चा करताना, निकालावर संशय व्यक्त करण्यात आला.

**आदित्य ठाकरेंकडे संयुक्त सभागृहाचे नेते पद**

विधानसभा आणि विधान परिषदेतील आमदारांच्या नेते पदाची जबाबदारी युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. तर प्रतोद पदी सुनील प्रभू यांची निवड केली आहे.

## समोर फडण'वीस' असले तरी तुम्ही 20 आहात- उद्धव ठाकरे

■ मुंबई, दि. २५ प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा पराभव झाल्यानंतर, उद्धव ठाकरे यांनी आपल्या 20 निवडून आलेल्या आमदारांशी बैठक घेतली. त्यांनी आमदारांना धीर दिला आणि महायुती सरकारच्या विरोधात प्रभावीपणे काम करण्याचे आवाहन केले. उद्धव ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीनंतर आपल्या सर्व 20 आमदारांना मुंबईत आपल्या 'मातोश्री' निवासस्थानी बोलवत त्यांच्यासोबत संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आपल्याला आता पुढे काय करायचं आहे, महायुतीचा कसा सामना करायचा आहे, याबाबत मार्गदर्शन केलं. यावेळी उद्धव ठाकरे यांनी ठाकरे गटाच्या निवडून आलेल्या आमदारांच्या संख्याबळाचा धागा पकडत त्यांनी आमदारांना पुढील कामकाजांचा कानमंत्र दिला. विधानसभेत फडणवीस असले तरी तुम्ही संख्येने 20 आहात. तुम्ही त्यांना पुरुन उरा, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

यावेळी उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या जडणघडणबाबतही भाष्य केलं. "शिवसेना स्थापनेच्या काळात वामनराव महाडिक हे शिवसेनेचे एकमेव आमदार विधानसभेत होते. ते एकमेव असतानादेखील विधानसभा गाजवत असत, पण तुम्ही तर संख्येने 20 आहात. त्यामुळे विधानसभा आपल्या भूमिकांनी आणि मुद्द्यांनी गाजवा", अशी सूचना उद्धव ठाकरे यांनी आमदारांना दिली. या बैठकीनंतर सर्व आमदार विधान भवनाच्या दिशेला निघाले. सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करण्यासाठी हे आमदार विधान भवनाच्या दिशेला रवाना झाले.

## मला ट्रम्पेटचा लाभ झाला- वळसे पाटील

■ मुंबई

दिवंगत नेते आणि माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची आज जयंती, त्यानिमित्त वाय.बी. चव्हाण प्रतिष्ठानच्या बैठकीसाठी दिलीप वळसे पाटील आणि शरद पवार एकत्र आले होते. त्यावेळी, वळसे पाटील यांनी सध्याच्या निवडणूक निकालावर शरद पवार यांच्याशी थोडक्यात चर्चा केली. यंदाची निवडणूक ही वेगळ्या प्रकारची निवडणूक झाल्याचे शरद पवार यांनी म्हटलं, असेही वळसे पाटील यांनी शरद पवारांच्या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले. मुंबईतील वाय.बी. चव्हाण प्रतिष्ठानचा विश्वस्त या नात्याने मी बैठकीला हजर होतो, या बैठकीत शरद पवारांचे मी आशिर्वाद घेतले. मी विसरलो की ते काय बोलले, पण आमच्यात राजकिय चर्चा झाली नाही. केवळ यंदाची निवडणूक वेगळी असल्याचं ते म्हणाले, असं दिलीप वळसे पाटील यांनी सांगितलं. तर, विधानसभा निवडणुकीत तुमच्या मतदारसंघात ट्रम्पेट चिन्हावरील डमी उमेदवारामुळे तुमचा विजय झाला का, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला असता, होय लाभ झाल्याचं सांगत त्यांनी प्रांजळ कबुली दिली. हे खरे आहे की मला ट्रम्पेटचा लाभ झाला, माझ्या इथे ट्रम्पेटने मते घेतली. पण, इतर भागात तसा परिणाम झाला का ते मला माहिती नाही, असेही पाटील यांनी म्हटले.

## मतदारांचा विश्वास सार्थ करण्यासाठी जीवाचे रान करू, शिंदेंचे मतदारांना पत्र

■ मुंबई



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा निवडणुकीत शिवसेना-भाजप- राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीला भरभरून मतदान केल्याबद्दल मतदारांचे आभार मानले आहेत. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडका शेतकरी, युवा, ज्येष्ठ नागरिक यांनी शिवसेनेवर मतांच्या माध्यमातून जो स्नेहाचा वर्षाव केला, जो विश्वास दाखवला तो आम्ही कधीही विसरणार नाही,असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

पत्रात शिंदे म्हणतात की, विधानसभा निवडणुकांच्या निकालात आपण शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महायुतीच्या पदरात भरभरून दान दिलं. आपणाला कोटी कोटी धन्यवाद... आपण शिवसेनेसह महायुतीच्या घटकपक्षांवर जो विश्वास दाखवला आहे तो सार्थ करण्यासाठी आम्ही जीवाचे रान करू. वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारानुसार वाटचाल करणाऱ्या शिवसेनेला मतदारांनी दिलेला कौल हा आम्ही गेल्या अडीच वर्षात केलेल्या विकासामुळे मिळाला आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेबांचा वसा, देशाचे आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांचे आम्हाला मिळत असलेले मार्गदर्शन आणि सहकार्य यामुळे महायुती अधिकच भक्कमपणे कार्य करीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांच्या विकसित भारत संकल्पनेला वास्तवात आणण्यासाठी महायुती 24x7 कार्यरत राहील. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडका शेतकरी, युवा, ज्येष्ठ नागरिक यांनी शिवसेना महायुतीवर आपल्या मतांतून जो स्नेहाचा वर्षाव केला आहे तो आम्ही कधीच विसरणार नाही. आपला महाराष्ट्र देशात सदैव अग्रेसर राहण्यासाठी आमचा यापुढेही प्रयत्न राहील.

80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण ही शिवसेनेची कार्यपद्धत आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील सामाजिक पाया भक्कम करतानाच राज्यातील महिला, युवा, शेतकरी गरिबांच्या कल्याणासाठी भविष्यातअधिक जोमाने काम करण्याची ताकद आपण आम्हाला दिली आहे. आम्ही आपल्या ऋणात राहून महाराष्ट्राच्या कल्याणासाठी झटत राहू, अशी ग्वाही यानिमित्ताने देतो.

या निवडणुकीत शिवसैनिकांनी घेतलेल्या मेहनतीचं हे फळ आहे. महायुती सरकारने अडीच वर्षात केलेलं काम गावोगावी, नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचं काम शिवसैनिक आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी केलं आहे. रात्रीचा दिवस करून आपण टाकलेला विश्वास सार्थ करण्यासाठी आम्हाला आपलं भक्कम पाठबळ मिळालं आहे. चला महाराष्ट्राच्या विकासासाठी पुन्हा सज्ज होऊया... पुनश्च एकदा आपले आभार...

## अजित पवारांनी महायुतीचा धर्म पाळला नाही- राम शिंदेंचा आरोप

■ मुंबई

कराड येथील प्रीतीसंगमावर यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस्थळावर दर्शन घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार गेले असता त्यांची आणि रोहित पवार यांची समोरासमोर भेट झाली. याप्रसंगी रोहित पवार यांनी अजित पवार यांचे चरण स्पर्श करून आशीर्वाद घेतले. यादरम्यान अजित पवार म्हणाले की, "बेट्या थोडक्यात वाचलास माझी सभा झाली असती तर,..." यावरून रोहित पवार यांचे प्रतिस्पर्धी आणि भाजपा नेते राम शिंदे यांनी अजित पवारांवर टीकेची झोड उठवलीय. पवार कुटुंबाने पूर्णपणे कटकारस्थान रचून आपला पराभव केल्याचा आरोप राम शिंदे यांनी केलाय, ते मुंबईत बोलत होते.

या विषयावर बोलताना राम शिंदे म्हणाले की, ज्या दिवशी निवडणुकीचा निकाल लागला, त्या दिवशी रोहित पवारांनी अजित पवारांची रात्री उशिरा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले होते. पण आज प्रीतीसंगमावर सर्वांसमोर उघडपणे रोहित पवार आणि अजित पवार यांची भेट झालीय. याप्रसंगी बोलताना अजित पवार यांनी उघडपणे सांगितले की, "बेट्या थोडक्यात बचावलास, मी सभा घेतली असती तर..." यावरून सर्व काही उघड होतं. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती स्थळावर अशा पद्धतीचं राजकारण त्यांनी केलंय. निवडणुकीमध्ये विजय, पराजय होत असतात. परंतु अशा पद्धतीने कटकारस्थान करून एखाद्या सामान्य माणसाला हरवणे हे नीतीला मान्य नाही.

राम शिंदे पुढे म्हणाले की, अजित पवार यांनी कर्जत-जामखेड मतदारसंघामध्ये सभा घ्यावी म्हणून मी पक्षाकडे वारंवार मागणी केली होती. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनाही विनंती केली होती. परंतु त्यांनी सभा दिली नाही. 7 ऑक्टोबरला मी स्वतः अजित पवार यांनी सभा घ्यावी, यासाठी त्यांना मेसेज पाठवला होता. अशा प्रकारे महायुतीचा धर्म अजित पवार यांनी पाळला नाही. रोहित पवारांनी मतदारसंघामध्ये 60 लाख रुपये वाटले, त्याची एफआयआर कॉपीसुद्धा माझ्याकडे आहे. जो काही प्रकार झाला आहे तो अतिशय वाईट असून, याबाबत पुढे काय कारवाई होते ते पाहावे लागेल, असेही राम शिंदे म्हणालेत.

## मासेमारी करणाऱ्या बोटीत सापडले पाच टन ड्रग्ज

■ नवी दिल्ली

अंदमानला लागून असलेल्या समुद्रांत भारतीय तटरक्षक दलाने भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठा ड्रग्जचा साठा जप्त केला आहे. संरक्षण विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार एका मासेमारी करणाऱ्या बोटीत पाच टन इतके ड्रग्ज आढळून आले. तटरक्षक दलाकडून सोमवारी ही कारवाई करण्यात आली.

परदेशातून भारतात येत असलेला ड्रग्जचा मोठा साठा सोमवारी जप्त करण्यात आला. भारतीय तटरक्षक दलाने अंदमान आणि निकोबार लागून असलेल्या बंगालच्या उपसागरात ही कारवाई केली.

संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार एका मासेमारी करणाऱ्या बोटीत पाच टन ड्रग्ज आढळून आले. तटरक्षक दलाने जप्त केलेला




आतापर्यंतचा हा सर्वात मोठा साठा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार तटरक्षक दलाला संशयित बोटीबद्दल माहिती मिळाली होती. त्यानंतर ही बोटीची माहिती घेण्यात आली आणि त्यानंतर तिचा शोध घेण्यात आला. तटरक्षक दलाच्या ड्रोनियर २२८ हेलिकॉप्टरच्या साहाय्याने बोटीचा समुद्रात शोध घेण्यात आला. बोट सापडल्यानंतर तिची झाडाझडती घेण्यात आली. त्यात पाच टन ड्रग्जचा साठा आढळून आला. या प्रकरणी पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.

## संभलमधील दंगेखोरांवर मोठ्या कारवाईची तयारी
## 800 जणांविरोधात एफआयआर

■ संभल

उत्तर प्रदेशमधील संभल येथे झालेल्या हिंसाचाराप्रकरी पोलिसांनी ७ एफआयआर नोंदवल्या आहेत. त्यात एकूण ८०० समाजकंटकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच दंगेखोरांची ओळख पटवण्यासाठी सीसीटीव्ही तपासले जात आहेत. त्याशिवाय ड्रोन फुटेजच्या माध्यमातून समाजकंटकांचे फोटो घेतले जात आहेत. सध्या संभलमध्ये कलम १६३ लागू करण्यात आलं आहे. तसेच येथील इंटरनेटसेवा मंगळवारपर्यंत स्थगित करण्यात आली आहे. त्याशिवाय तणाव टाळण्यासाठी पोलिसांचा मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



संभलचे एसपी के.के. बिश्नोई यांनी सांगितले की, जामा मशिदीबाहेर झालेल्या हिंसाचारामध्ये १५ पोलीस कर्मचारी आणि ४ अधिकारी जखमी झाले होते. दगडफेकीमधून वाचण्याच्या प्रयत्नात एसडीएमच्या पायाला दुखापती झाली. त्यानंतर त्यांनी ८०० दंगेखोरांविरोधात एफआयआर दाखल केली आहे. त्याशिवाय एसपींचे पीआरओ आणि सीओ यांच्या पायामध्ये गोळी लागली. या प्रकरणी आतापर्यंत २५ जणांना अटक करण्यात आली आहे. त्यांनी सांगितले की, कोर्टाच्या आदेशानंतर एसडीएम आणि इतर अधिकाऱ्यांची मिळून एक समिती स्थापन करण्यात आली होती. मशिदीचा सर्व्हे करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. सद्यस्थितीत संभलमध्ये कलम १६३ लागू आहे. मात्र आता परिस्थिती नियंत्रणात आहे. काही ठिकाणी दुकानंही उघडली आहेत. मात्र आम्ही खबरदारीचा उपाय म्हणून इंटरनेट बंद ठेवण्याची विनंती डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांना केली आहे.

तत्पूर्वी पोलिसांनी समाजवादी पक्षाचे खासदार जियाउर्रहमान बर्क आणि स्थानिक आमदाराचे पुत्र सोहेल इक्बाल यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. समाजवादी पक्षाच्या खासदारांनी नियोजनबद्धरीत्या हिंसाचार भडकवल्याचा आणि जमाव गोळा करून त्यांना चिथावणी दिल्याचा आरोप आहे. जियाउर्रहमान बर्क यांनी मशिदीतील सर्व्हेबाबत केलेल्या प्रक्षोभक विधानांमुळे जमाव संतप्त झाली आणि हिंसाचारास सुरुवात झाली, असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

मराठी अक्रॉस मुंबई

# आयपीएस अधिकारी रश्मी शुक्लांवर निवडणूक आयोगाने तात्काळ कारवाई करावी: अतुल लोंढे

## आचारसंहिता लागू असताना गृहमंत्र्यांना भेटून आचारसंहितेचा भंग

**मुंबई**

आदर्श आचारसंहिता लागू असताना आयपीएस अधिकारी रश्मी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आचारसंहितेचा भंग केलेला आहे. निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घेऊन रश्मी शुक्ला यांच्यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना अतुल लोंढे म्हणाले की, तेलंगणामध्ये अशाच प्रकारे पोलीस महासंचालक व एका वरिष्ठ अधिकाऱ्याने वरिष्ठ मंत्र्याची भेट घेतली असता निवडणूक आयोगाने त्यांच्यावर तात्काळ कारवाई केली होती. गैर भाजपा राज्यात निवडणूक आयोग तात्काळ कारवाई करते पण भाजपाशासित राज्यात निवडणूक आयोगाला काही दिसतच नाही का? हा प्रश्न आहे. रश्मी शुक्ला यांच्यावर विरोधी पक्षांच्या नेत्यांचे फोन टॅपिंग करण्यासारखे



गंभीर गुन्हे आहेत. रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवावे अशी मागणी काँग्रेस पक्षाने निवडणुकीच्या काळात केली असता त्यांना पदावरून हटवण्यात आले आहे. विधानसभेचा निकाल लागला असला तरी निवडणूक आचारसंहिता संपण्या आधीच गृहमंत्र्यांना भेटून रश्मी शुक्ला यांनी आदर्श आचार संहितेचे उल्लंघन केलेले आहे, त्यांच्यावर तातडीने कारावाई झाली पाहिजे असे अतुल लोंढे म्हणाले.

# योगींनी प्रचार केलेले 17 उमेदवार विजयी



**मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक पार पडल्या आहेत. ज्यांचे निकालही शनिवारी घोषित झाले. यामध्ये महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले आहे. त्यातच आता राज्यात सरकार बनवण्याच्या हालचाली गतीमान झाल्या आहेत. भाजपने सर्वाधिक जागा जिंकल्याने देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील अशी चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान या विजयामध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची महत्वाची भूमीका राहिली आहे.

महाराष्ट्र विधानसभेचे निकाल स्पष्ट झाल्यानंतर जनतेने महायुतीच्या पारड्यात बहुमत घातल्याचे दिसून आले. याचे श्रेय उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनाही दिले जात आहे. महाराष्ट्रात योगींचे पोस्टर पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनले आहेत. या पोस्टरवर त्यांचा स्ट्राईक रेट ९५ टक्के असे लिहिण्यात आले आहे.

महाराष्ट्रात महायुतीच्या प्रचंड विजयानंतर महायुतीचे नेते आणि कार्यकर्त्यांच्या संयुक्त प्रचारही चर्चेचा विषय बनला आहे. भारतीय जनता पक्षाने या निवडणुकीत प्रचारासाठी तब्बल ४० स्टार प्रचारक उतरवले होते. या लिस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप अध्यक्ष प्रकाश नड्डा, केंद्रीय गृह मंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह अनेक मोठ्या चेहऱ्यांना भाजपने स्टार प्रचारक म्हणून समोर आणले होते. या ४० नावांमध्ये सर्वाधिक चर्चेत नाव आहे ते उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे.

तज्ज्ञांच्या विश्लेषणानुसार, योगी आदित्यनाथ यांनी १८ भाजप उमेदवारांसाठी प्रचार केला होता, ज्यामध्ये १७ उमेदवारांचा विजय झाला आहे. यातील फक्त एकच भाजपचे अकोला पश्चिम विधानसभा जागेवरून निवडणूक लढवणारे विजय अग्रवाल यांचा पराभव झाला आहे. अग्रवाल यांचा काँग्रेसच्या साजिद खान यांनी फक्त एक हजार मतांनी पराभव केला. अशा प्रकारे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी ९५ टक्के स्ट्राईक रेट मिळाला आहे.

# मुंबईतील ३४५ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त



**मुंबई**

विधानसभा निवडणुकीत मुंबईतील ३४५ उमेदवारांना इतकी कमी मते पडली आहेत की त्यांना आपली अनामत रक्कमही जपता आलेली नाही. मुंबईतील एकूण ४२० उमेदवारांपैकी केवळ ७५ उमेदवारांनी भरघोस मते मिळाली आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीच्या प्रमुख लढतीत अपक्ष आणि लहान पक्षाच्या उमेदवारांकडे मतदारांनी दुर्लक्ष केले असल्याचे आढळून आले आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी मुंबई शहर आणि उपनगरात मिळून ३६ मतदारसंघांसाठी ४२० उमेदवार उभे होते. मोठ्या संख्येने उमेदवार उतरलेले असले तरी प्रत्यक्षात गावेळची लढत ही शिवसेना (शिंदे) आणि भाजप महायुती व काँग्रेस, शिवसेना (ठाकरे) महाविकास आघाडीतच होती. तरीही अनेक मतदारसंघांमध्ये अपक्ष, बंडखोर, लहान पक्षांचे उमेदवार उभे होते. निवडणूक आयोगाच्या निकषांनुसार उमेदवाराला एकूण वैध मतांच्या एक षष्ठमांश म्हणजेच १६.३३ टक्के मते किंवा त्यापेक्षा कमी मते मिळाल्यास त्याची अनामत रक्कम जप्त होते. विधानसभेच्या निवडणुकीसाठी यावेळी उमेदवारांना दहा हजार रुपये अनामत रक्कम भरावी लागली होती. तर आरक्षणांतर्गत असलेल्या उमेदवाराला हीच रक्कम पाच हजार रुपये होती. सर्वच मतदारसंघांत युती व आघाडी अशी लढत असल्यामुळे पहिल्या दोन उमेदवारांव्यतिरिक्त सर्वांचीच अनामत रक्कम जप्त झाली.

# आरटीई प्रवेश नोंदणी लवकर सुरू करण्याची पालकांची मागणी

**मुंबई**

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत राबवण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रिया यंदा डिसेंबरपासूनच सुरु करा. यंदा झालेला गोंधळ येत्या शैक्षणिक वर्षातही करु नका, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे प्रवेश डिसेंबरपासूनच सुरु करा, अशी मागणी पालकांतून होत आहे.

राज्यातील ९ हजार २१७ खासगी शाळांमध्ये १ लाख ५ हजार २३८ रिक्त जागांसाठी २ लाख ४२ हजार ५१६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. ऑनलाइन सोडतीद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्यासाठी तीन फेऱ्या राबवण्यात आल्या. त्यातून ७८ हजार ३७६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. २६ हजार ८६२ जागा यंदा रिक्त राहिल्या. प्रवेशांच्या नियमांत केलेल्या बदलामुळे उद्भवलेली न्यायालयीन प्रक्रिया, प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यास झालेल्या विलंबाचा फटका प्रवेश प्रक्रियेला बसलेला दिसला. अगोदरच पालकांनी अन्य शाळांत बालकांचे प्रवेश घेतले, उशिरा प्रवेश सुरु राहिल्यामुळे मुंबईत २ हजारहून अधिक जागा रिकामी राहिल्या अशी तक्रारीही पालकांच्या होत्या. प्रवेश प्रक्रियेबाबत गोंधळ निर्माण झाला. शिक्षण विभागाच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया ठप्प झाली होती. याचा परिणाम प्रवेशावर झाला. काही बालकांचे प्रवेश अगोदरच शाळांत झाल्यामुळे जागाच भरलेल्या नाहीत.

बहुतांश खासगी शाळा डिसेंबरपासून नर्सरी आणि पहिलीच्या प्रवेशाला प्रारंभ करतात. त्यामुळे वय वर्ष पूर्ण होत असलेल्या बालकांचे प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाते. काही पालक अगोदरच प्रवेश पूर्ण करतात. आरटीई प्रवेश हे उशिरा सुरु होतात त्यामुळे पालकांना अडचणींना सामना करावा लागतो.

# दहावी, बारावीचा 17 नंबरचा अर्ज 31 डिसेंबरपर्यंत भरता येणार

**मुंबई**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येत असलेल्या दहावी आणि बारावीच्या खाजगी विद्यार्थ्यांसाठी १७ नंबर फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया सध्या सुरू असून इच्छुक विद्यार्थ्यांना ३१ डिसेंबरपर्यंत अतिरिक्त परीक्षा शुल्क भरून ऑनलाईन अर्ज करता येणार आहे.

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दहावी व बारावीच्या परीक्षांसाठी खाजगी विद्यार्थ्यांना नावनोंदणीची प्रक्रिया मंडळाकडून सुरु आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शिक्षण प्रवाहामधून विशिष्ट कारणांमुळे ब्रेक घेतला आहे किंवा ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी दहावी उत्तीर्ण

केली आहे. अशा विद्यार्थ्यांना या परीक्षेद्वारे शिक्षण पूर्ण करण्यासाठी नवी संधी या माध्यमातून करता येते. ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, विद्यार्थ्यांना ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत उशिरा अर्ज करण्यासाठी अतिरिक्त परीक्षा शुल्क भरावे लागणार आहे.

विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीय प्रत व प्रतिज्ञापत्र, आधारकार्ड, स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो, ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई- मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.


# वाहने भंगारात काढण्यासाठी महापालिका तीन कंत्राटदार नेमणार

**मुंबई**

मुंबईतील जुन्या आणि प्रदूषणकारी गाड्यांची विल्हेवाट लावण्याचा महत्त्वाचा मुद्दा पुढे येत असतानाच, मुंबई शहर व उपनगरांतील वाहने भंगारात काढण्यासाठी तीन स्वतंत्र कंत्राटदार नेमण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे. त्यामुळे महापालिकेचे नियोजित नवीन भंगारयार्ड (स्क्रॅपयार्ड) बासणात गुंडाळले जाण्याची शक्यता आहे.

नवीन नवीन भंगारयार्ड (स्क्रैपयार्ड) विकसित करण्याचा महापालिकेचा विचार आहे. त्याकरिता महापालिकेकडून जागेचा शोधही सुरू आहे. तत्पूर्वी, तीन कंत्राटदारांबरोबर सुरुवातीला एका वर्षासाठी करार केला जाणार आहे. त्यासाठी आज, सोमवारी निविदा भरण्याची अंतिम तारीख आहे. या कंत्राटदारांकडून मुंबईतील नऊ हजार वाहने भंगारात काढली जाणार असल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. कामातील प्रगती पाहूनच कंत्राटांचा विस्तार केला जाईल, असेही सांगण्यात आले.

मागील १० वर्षांत वाहनांच्या संख्येत मोठी वाढ झाली असून, वाहतूककोंडी, प्रदूषण आदी समस्या गंभीर रूप धारण करू लागल्या आहेत. त्यातच अनेक वाहने वर्षानुवर्षे रस्त्यांच्या कडेला असतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. महापालिकेकडून ही वाहने हटवण्यात येतात. त्यांच्या मालकी हक्कासाठी कुणी न आल्यास ही वाहने प्रत्येक वॉर्डस्तरावरील कंत्राटदारांकडून



जप्त करून महापालिकेच्या गोदामात ठेवली जातात. त्यानंतरही पुन्हा वाहनमालकाशी संपर्क साधला जातो आणि प्रतिसाद न मिळाल्यास ती भंगारात काढली जातात. दरम्यान, महापालिकेने स्वतःचे भंगारयार्डच तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्य सरकारच्या 'स्क्रैपेज धोरण २०२३'चा आधार घेतला जात आहे. या भंगारयार्डसाठी महापालिकेकडून बंद असलेल्या ऐरोली जकात नाक्याच्या जागेचा विचार केला जात होता. या जागेचा मालकीहक्क आणि अन्य प्रक्रियांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संबंधित विभागाकडे जुलै २०२४मध्ये चर्चाही सुरू होती. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाने त्याआधीच महापालिकेच्या अन्य एका विभागाला ही जागा भाडेतत्त्वावर दिली आहे. त्यामुळे आता दुसऱ्या जागेचा शोध घेण्यात येत आहे. सध्या मुंबईतील सर्व वॉर्डस्तरावर आयुर्मान संपलेली वाहने जप्त करून ती भंगारात काढण्यासाठी कंत्राटदार आहेत. मात्र या कामाचे योग्य नियोजन होत नाही. तसेच या कंत्राटदारांविरोधात अनेक तक्रारीही

महापालिकेकडे येत आहेत. त्यामुळे मुंबई शहरसाठी एक आणि पूर्व तसेच पश्चिम उपनगरासाठी प्रत्येकी एक कंत्राटदार नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वॉर्डस्तरावर जप्त केलेली, मालकी नसलेली, आयुर्मान संपलेली वाहने भंगारात काढण्याचे काम हे कंत्राटदार करतील. दीड कोटीपेक्षा अधिक बोली लावणाऱ्या कंत्राटदारालाच हे काम दिले जाणार आहे. यातून महापालिकेलाही महसूल मिळणार आहे.

# काळबादेवीत हत्येप्रकरणी आरोपीला अटक

**मुंबई**

काळबादेवी परिसरात रस्त्याच्या कडेला मृतावस्थेत सापडलेल्या व्यक्तीची हत्या करण्यात आल्याचा प्रकार उघड झाला आहे. पोलिसांनी केलेल्या सीसीटीव्ही तपासणीत त्याला एक व्यक्ती धक्काबुक्की करत असल्याचे समजले. अखेर पोलिसांनी याप्रकरणी २८ वर्षीय सराईत गुन्हेगाराला अटक केली आहे. त्याच्याविरोधात यापूर्वीही ९ गुन्हे दाखल आहे. काळबादेवी येथील पी.बी. रोड परिसरात रस्त्याच्या कडेला एक व्यक्ती बेशुद्धावस्थेत पडला असल्याचा दूरध्वनी मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाला मिळाला होता. पोलिसांनी येथील तत्काळ येथे जाऊन तपासणी केली असता सिंगापूरवाला इमारतच्या जवळ प्रवीण मेटल दुकानाच्या समोर पदपथावर एक व्यक्ती पडली होती. त्या व्यक्तीला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी अपमृत्यूची नोंद करण्यात आली. आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहे.

# व्हिडीओ काढून तरुणीला धमकावणाऱ्या तरुणाला आटक

**मुंबई**

वांद्रे रिक्लेमेशन परिसरात फिरण्यासाठी आलेल्या तरुणीचा पाठलाग करून त्याचे चित्रण समाज माध्यमांवर वायरल करण्याची धमकी देणाऱ्या ३४ वर्षीय आरोपीला पोलिसांनी रविवारी अटक केली. आरोपीने यावेळी पोलिसांनाही मारहाण केल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी आरोपीविरोधात विनयभंग व सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाबर रेहमत खान (३४) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून तो नवी मुंबईतील रहिवासी आहे. आरोपी खासगी सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. २६ वर्षांची पीडित मुलगी तिच्या मैत्रिणीसोबत वांद्रे येथील रिक्लेमेशन परिसरात फिरण्यासाठी आली होती. यावेळी आरोपीने तिचा पाठलाग करून शिवीगाळ केली. तसेच आरोपी पाठलाग करत असताना त्याने बनवलेला व्हिडिओ समाज माध्यमांवर वायरल करण्याची धमकी दिली.

पीडित मुलीच्या तक्रानंतर याप्रकरणी वांद्रे पोलिसांनी आरोपी खानला ताब्यात घेतले व वांद्रे पोलीस ठाण्यात आणले. तेथेही आरोपीने पोलिसांना शिवीगाळ करण्यास व आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. यावेळी आरोपीने पोलीस शिपाई गोराडे यांना मारहाण केली. तसेच, दुसऱ्या पोलिसाचा गणवेश फाडला. याप्रकरणी पोलिसांनी तत्काळ विनयभंग व सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

# सी साईड प्लाझ्राचे लवकरच भूमिपूजन

**मुंबई**

मलबार हिल येथील प्रमोद नवलकर गॅलरीनंतर मरीन ड्राईव्ह येथे ५२ मीटर लांब व ५ मीटर रुंद असा 'सी साईड प्लाझा' उभारण्यात येणार असून याचे भूमिपूजन लवकरच करण्यात येणार आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांना समुद्रासह मरीन ड्राईव्ह परिसर न्याहाळता येणार आहे.

मरिन ड्राईव्हसह फ्लोरा फाऊंटन, एशियाटिक लायब्ररी परिसरात देश- विदेशातून येणारे पर्यटक व नागरिकांच्या सोयीसुविधांच्या दृष्टिकोनातून या परिसराचा हेरीटेज विकास करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. त्यामुळे डिसेंबर अखेरपर्यंत याचे भूमिपूजन करण्याचा महापालिकेचा मानस आहे. मुंबई सुशोभीकरण प्रकल्पात मरीन ड्राईव्ह परिसरातील नागरी सुविधा, स्वच्छता व सुशोभीकरण कामांचा आढावा घेण्यात आला. मरीन ड्राईव्ह परिसरातील समुद्राच्या दिशेने उभ्या असलेल्या



इमारतींना विशिष्ट रंगरंगोटी देण्यासह प्रसाधनगृहे, स्वच्छता आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचा लेझर शो याठिकाणी सुरू करण्यात येणार आहेत. पर्यटकांना समुद्र पाहण्यासाठी योग्य नियोजन करण्यात येणार आहे. मरीन ड्राईव्ह येथे एक व्ह्यविंग डेक (सी साईड प्लाझा) तयार करण्यात येत आहे. व्ह्यविंग डेकची निर्मिती पालिकेच्या नियोजन विभागाकडून केली जात आहे. ही गॅलरी तयार झाल्यानंतर पर्यटकांना थेट समुद्रात जाता येणार आहे. त्यामुळे मुंबईच्या पर्यटन स्थळांमध्ये अजून एका पर्यटन स्थळाची भर पडणार आहे.

# मुंबईत 71 हजारांहून अधिक 'नोटा'चा वापर

**मुंबई**

भाजप, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) महायुतीने मुंबईमध्ये २२ मतदारसंघात विजय मिळवून सरशी केली आहे. महायुतीला घसघशीत यश मिळाले असले तरी मुंबईमधील विविध मतदारसंघांतील ७१ हजार ९१२ मतदारांनी मतदानाच्या वेळी 'नोटा'चा पर्याय निवडून सर्वच उमेदवारांना नाकारल्याचे उघडकीस आले आहे.

पूर्व उपनगरांतील अणुशक्ती नगर मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे तीन हजार ८८४ मतदारांनी 'नोटा'चा पर्याय निवडल्याचे निदर्शनास आले आहे. या मतदारसंघात राष्ट्रवादीचे (अजित पवार) नेते नवाब मलिक यांच्या कन्या सना मलिक यांनी राष्ट्रवादीचे (शरद पवार) फहाद अहमद यांचा पराभव केला. मुलुंड मतदारसंघात ३,८३४ मतदारांनी 'नोटा'ला पसंती देत उमेदवारांना नाकारले.

धारावीमधील रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी मुलुंड परिसरातील भूखंड देण्याच्या हालचालींमुळे बहुसंख्य मुलुंडकर नाराज आहेत. ही नाराजी 'नोटा'च्या रूपात




मतपेटीत बंद झाली. परंतु असे असले तरी बालेकिल्ल्यातील मतदारांनी भाजपला साथ देत उमेदवाराला विजयी केले.

मुंबई शहर जिल्ह्यातील मुंबादेवी मतदारसंघात काँग्रेस विरोधात शिवसेना (एकनाथ शिंदे) अशी लढत झाली. काँग्रेसने पुन्हा आमदार अमिन पटेल यांना उमेदवारी दिली होती, तर भाजप नेत्या शायना एन.सी. यांना शिवसेनेने (एकनाथ शिंदे) उमेदवारी देऊन अमिन पटेल यांच्यासमोर आव्हान निर्माण केले होते. मात्र या मुस्लीमबहुल मतदारसंघात पुन्हा अमिन पटेल यांच्या पारड्यात भरभरून मते पडली. या मतदारसंघात सर्वात कमी म्हणजे १,११३ मतदारांनी 'नोटा'चा पर्याय निवडल्याचे निदर्शनास आले.

# अल्पवयीन मुलीशी अश्लील वर्तन करणाऱ्याला अटक

**मुंबई**

अल्पवयीन मुलीसोबत अश्लील वर्तन करणाऱ्या ७८ वर्षीय व्यक्तीला बोरिवली येथील एमएचबी कॉलनी पोलिसांनी शनिवारी अटक केली. पीडित मुलगी खेळत असताना आरोपीने तिला जवळ बोलावून तिच्यासोबत अश्लील कृत्य केले. याप्रकरणी आरोपीविरोधात विनयभंग व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगी १० वर्षांची असून ती खेळायला जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडली. ती घराजवळ खेळत असताना ७८ वर्षीय आरोपीने तिला हाक मारली. त्यावेळी ती आरोपीजवळ गेली असता त्याने तिच्यासोबत अश्लील कृत्य केले. त्यामुळे पीडित मुलगी घाबरली. ती घरी आली, त्यावेळी घडलेला प्रकार तिच्या आईला सांगितला. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने पोलिसांकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी एमएचबी पोलीस ठाण्यात जाऊन घडलेल्या प्रकार पोलिसांना सांगितले. त्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पीडित मुलीच्या आईची तक्रार नोंद करून याप्रकरणी पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला. याप्रकरणी आरोपीची माहिती घेऊन त्याच्याशोधासाठी पोलीस पथक घटनास्थळी रवाना झाले. आरोपीला रात्री उशिरा राहत्या परिसरातून अटक करण्यात आली. याप्रकरणी एमएचबी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# अंगणवाडी सेविका भत्त्यापासून वंचित

**मुंबई**

राज्यात महायुती सरकारने केलेल्या 'लाडक्या बहीण योजने'चा फायदा महायुती सरकारला झाला. मात्र या योजनेची ऑनलाईन प्रक्रिया राबविणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना काम केलेला भत्ता अद्यापपर्यंत मिळालेला नाही. अंगणवाडी सेविका, मदतनीस या राज्य सरकारच्या लाडक्या कधी होणार व काम केलेला भत्ता कधी मिळणार ? अशी विचारणा अंगणवाडी कर्मचाऱ्यांमधून होत आहे.

याबाबत अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या कार्याध्यक्षा संगीता कांबळे म्हणाल्या, राज्यात सुमारे दोन लाख अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी तळागाळापर्यंत लाडक्या बहीण योजनेचे अहोरात्र काम केले. या योजनेचे ऑनलाईन अर्ज भरणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना प्रति



लाभार्थ्यांमागे ५० रुपये देण्याचे सरकारने घोषित केले. त्याप्रमाणे अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी या योजनेचे काम केले. ५ महिने या योजनेतील लाभार्थीना दर महिन्याला १५०० रुपये सरकारने दिले, पण या योजनेचे काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना कामाचा भत्ता न मिळाल्याने अंगणवाडी कर्मचाऱ्यांमधून नाराजीचा सूर आहे.

उच्चभ्रू वस्तीपासून ते सर्वसामान्य आणि झोपडपट्टी रहिवाशापर्यंत सर्वांचे अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी अर्ज भरून घेतले. विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेआधी या योजनेचे काम बंद झाले. राज्यभरातील बहुतांश अंगणवाडी कर्मचाऱ्यांना हा कामाचा भत्ता मिळावा, अशी मागणी संघटनेने यापूर्वी सरकारबरोबर पत्रव्यवहार करुन केली होती. मात्र; त्याची अंमलबजावणी झाली नाही. आता राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आले आहे. त्यांच्याच काळात ही योजना आली आहे. या योजनेचा बहुतांश; फायदा महायुतीमधील सर्व उमेदवारांना झाला, त्यामुळे नव्या सरकारने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या थकीत असलेला कामाच्या भत्त्याची अंमलबजावणी करुन तो लवकर द्यावा, अशी मागणी संगीता कांबळे यांनी केली आहे.

# चंदगडचे आमदार शिवाजी पाटील यांचा भाजपला पाठिंबा

**मुंबई**



चंदगड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष शिवाजी पाटील यांनी २४ हजारांवर मताधिक्याने विजय संपादन केला. रविवारी त्यांनी थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यालय गाठून भाजपला पाठिंबा देत असल्याचे पत्र दिले. फडणवीस यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. शिवाजी पाटील यांनी गेल्या पाच वर्षांपासून भाजपमधून उमेदवारी मिळेल या अपेक्षेने तयारी केली होती; मात्र राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत सहभागी झाल्याने उमेदवारीचा पेच निर्माण झाला होता. तरीही शिवाजी पाटील यांनी निवडणूक लढवली आणि ते जिंकले. विजयानंतर त्यांनी मतमोजणी केंद्रावरच भाजप हा माझा श्वास आहे, त्याला सोडून मी काहीच करू शकत नाही, असे स्पष्ट केले होते. त्यानुसार फडणवीस यांची भेट घेत भाजपसोबत असल्याचे पत्र त्यांनी सादर केले.

# आता पसंतीचा वाहन क्रमांक ऑनलाईन

**मुंबई**

लाखो-करोडो रुपये खर्च करून नवीन वाहन खरेदी केल्यानंतर आता ऑनलाइन पद्धतीने आकर्षक वाहन क्रमांक मिळवण्याची सुविधा आरटीओद्वारे राज्यभरात सुरू केली जाणार आहे. त्यामुळे घरबसल्या पसंतीचा वाहन क्रमांकाची नोंद करता येणार आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये राज्य सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार राज्य सरकारने हाव्हीआयपीद्ध वाहन क्रमांकांच्या किमतीत वाढ केल्याचे जाहीर केले.



त्यामुळे वाहनधारकांना जास्त पैसे मोजून पसंतीचा वाहन क्रमांकाची नोंदणी केली करावी लागत आहे. पसंतीचा वाहन क्रमांक खरेदी गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी झाली आहे. परंतु, उत्पन्नात वाढ झाली आहे. तर, आता वाहनधारकांचे कार्यालयातील करण्यासाठी आरटीओ फेऱ्या बंद सोमवारपासून ऑनलाइन सेवा सुरू केली जाणार आहे.

# अपघातात दोन तरुणांचा मृत्यू

**मुंबई**

विलपार्ले येथे मोटरगाडीच्या अपघातात दोन महाविद्यालयीन तरुणांचा मृत्यू झाला. याप्रकरणी एका मोटरगाडी चालवणाऱ्या तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. जलज धीर (१८) आणि सार्थक कौशिक अशी मृत मुलांची नावे आहेत. तर साहिल मेंढा (१८) असे आरोपीचे आहे. साहिल हा गोरेगाव पूर्व येथील रहिवासी आहे. मोटरगाडीतून प्रवास करणारा चौथा तरुण जेडन जिमी (१८) याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला आहे. जेडन, जलज, सार्थक आणि साहिल हे सर्व एकाच शाळेत आणि कनिष्ठ महाविद्यालयात एकत्र शिकत असल्यामुळे ते एकमेकांचे चांगले मित्र होते. पोलिसांच्या माहितीनुसार, शनिवारी रात्री साडे बारा वाजता हे चार जण जलज धीरच्या गोरेगाव (ईस्ट) येथील घरात एकत्र आले होते आणि तासभर व्हिडिओ गेम खेळले. त्यानंतर रात्री साडेतीन वाजता, त्यांनी साहिलच्या होण्डा सिटी मोटरगाडीमधून फिरण्यास गेले. मोटरगाडी चालवणाऱ्या साहिलचे नियंत्रण गाडीवरून सुटले आणि गाडी रस्त्याच्या दुभाजकावरील खांबाला धडकली, असे जेडनने पोलिसांना सांगितले. याप्रकरणी जेडनच्या तक्रारीवरून, पोलिसांनी साहिलविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ : नवनिर्वाचित आमदार

१ अक्कलकुवा - आमशा पाडवी (एकनाथ शिंदे शिवेसना)
२ शहादा - राजेश पाडवी (भाजप)
३ नंदुरबार - विजयकुमार गावीत (भाजप)
४ नवापूर - कृष्णकुमार नाईक (काँग्रेस)
५ साक्री - मंजुळा गावित (शिवसेना शिंदे)
६ धुळे ग्रामीण - राघवेंद्र पाटील (भाजप)
७ धुळे शहर - अनुप अग्रवाल (भाजप)
८ सिंदखेडा - जयकुमार रावल (भाजपा)
९ शिरपूर - काशिराम पावरा (भाजप)
१० चोपडा - चंद्रकांत सोनावणे (शिवसेना शिंदे)
११ रावेर - अमोल जावळे (भाजप)
१२ भुसावळ - संजय सावकारे (भाजप)
१३ जळगाव शहर - सुरेश भोळे (भाजप)
१४ जळगाव ग्रामीण - गुलाबराव पाटील (शिवसेना शिंदे)
१५ अमळनेर - अनिल पाटील (अजित पवार राष्ट्रवादी)
१६ एरंडोल - अमोल पाटील (शिवसेना शिंदे)
१७ चाळीसगांव - मंगेश चव्हाण (भाजप)
१८ पाचोरा किशोर पाटील (शिवसेना शिंदे)
१९ जामनेर - गिरीश महाजन (भाजपा)
२० मुक्ताईनगर - चंद्रकांत पाटील (शिवसेना शिंदे)
२१ मलकापूर - चैनसुख संचेती (भाजप)
२२ बुलढाणा - संजय गायकवाड (शिवसेना शिंदे)
२३ चिखली - श्वेता महाले (भाजप)
२४ सिंदखेड राजा - मनोज कायंदे (अजित पवार गट)
२५ मेहकर - सिद्धार्थ खरात (शिवसेना ठाकरे)
२६ खामगांव - आकाश फुंडकर (भाजप)
२७ जळगाव (जामोद) - डॉ. संजय कुटे (भाजप)
२८ अकोट - प्रकाश भारसाकळे (भाजप)
२९ बाळापूर - नितीन देशमुख (शिवसेना ठाकरे)
३० अकोला पश्चिम - साजिद खान (काँग्रेस)
३१ अकोला पूर्व - रणधीर सावरकर (भाजप)
३२ मुर्तिजापूर - हरीश पिंपळे (भाजप)
३३ रिसोड - अमित झनक (काँग्रेस)
३४ वाशिम - श्याम रामचरणजी खाडे (भाजप)
३५ कारंजा - सई डहाके (भाजप)
३६ धामणगाव रेल्वे - प्रताप अडसड (भाजप)
३७ बडनेरा - रवी राणा (भाजप पुरस्कृत)
३८ अमरावती - सुलभा खोडके (एनसीपी-अजित पवार)
३९ तिवसा - राजेश वानखेडे (भाजप)
४० दर्यापूर - गजाजन लवटे (शिवसेना ठाकरे)
४१ मेळघाट - केवलराम तुलसीराम काळे (भाजप)
४२ अचलपूर - प्रवीण तायडे (भाजप)
४३ वरूड-मोर्शी - उमेश यावलकर (भाजप)
४४ आर्वी - सुमित वानखेडे (भाजप)
४५ देवळी - राजेश बकाने (भाजप)
४६ हिंगणघाट - समीर कुणावार (भाजप)
४७ वर्धा - डॉ. पंकज भोयर (भाजप)
४८ काटोल - चरणसिंह ठाकूर (भाजप)
४९ सावनेर - आशिष देशमुख (भाजप)
५० हिंगणा - समीर मेघे (भाजप)
५१ उमरेड - संजय मेश्राम (काँग्रेस)
५२ नागपूर दक्षिण पश्चिम - देवेंद्र फडणवीस (भाजप)
५३ नागपूर दक्षिण - मोहन मते (भाजप)
५४ नागपूर उत्तर - डॉ. नितीन राऊत (काँग्रेस)
५५ कामठी - चंद्रशेखर बावनकुळे (भाजप)
५६ रामटेक - आशिष जैस्वाल (शिवसेना शिंदे)
५७ तुमसर - राजू कोरमोरे (एनसीपी-अजित पवार)
५८ भंडारा - नरेंद्र भोंडेकर (शिवसेना शिंदे)
५९ साकोली - नानाभाऊ पटोले (काँग्रेस)
६० अर्जुनी मोरगाव - राजकुमार बडोले (एनसीपी-अजित पवार)
६१ तिरोडा - विजय रहांगडाले (भाजप)
६२ गोंदिया - विनोद अग्रवाल (भाजप)
६३ आमगाव - संजय पुरम (भाजप)
६४ आरमोरी - रामदास मसराम (काँग्रेस)
६५ गडचिरोली - डॉ. मिलिंद नरोटे (भाजप)
६६ अहेरी - धर्मरावबाबा आत्राम (एनसीपी-अजित पवार)
६७ राजुरा - देवराव भोंगळे (भाजप)
६८ चंद्रपूर - किशोर जोरगेवार (भाजप)
६९ बल्लारपूर - सुधीर मुनगंटीवार (भाजप)
७० ब्रह्मपुरी - विजय वडेट्टीवार (काँग्रेस)
७१ चिमूर - बंटी भांगडिया (भाजप)
७२ वरोरा - करण संजय देवतळे (भाजप)
७३ वणी - संजय देरकर (शिवसेना ठाकरे)
७४ राळेगाव - अशोक उइके (भाजप)
७५ यवतमाळ - अनिल मंगुळकर (काँग्रेस)
७६ दिग्रस - संजय राठोड (शिवसेना शिंदे)
७७ आर्णी - राजू तोडसाम (भाजप)
७८ पुसद - इंद्रनील नाईक (एनसीपी-अजित पवार)
७९ उमरखेड - कशिन वानखेडे (भाजप)
८० किनवट - भीमराव केराम (भाजप)
८१ हदगाव - बाबुराव कोहळीकर (शिवसेना शिंदे)
८२ भोकर - श्रीजया चव्हाण (भाजप)
८३ नांदेड - बालाजी कल्याणकर (शिवसेना शिंदे)
८४ नांदेड दक्षिण - आनंद तिडके पाटील (शिवसेना शिंदे)
८५ लोहा- प्रताप पाटील चिखलीकर (एनसीपी-अजित पवार)
८६ नायगाव - राजेश पवार (भाजप)
८७ देगलूर - जितेश अंतापूरकर (भाजप)
८८ मुखेड - तुषार राठोड (भाजप)
८९ बसमत - चंद्रकांत नवघरे (एनसीपी-अजित पवार)
९० कळमनुरी - संतोष बांगर (शिवसेना शिंदे)
९१ हिंगोली - तानाजी मुटकुळे (भाजप)
९२ जिंतूर - मेघना बोर्डीकर (भाजप)
९३ परभणी - आनंद भरोसे (शिवसेना शिंदे)
९४ गंगाखेड - रत्नाकर गुट्टे (भाजप पुरस्कृत)
९५ पाथरी - राजेश विटेकर (एनसीपी-अजित पवार)
९६ परतूर - बबनराव लोणीकर (भाजप)
९७ घनसावंगी - हिकमत उढाण (शिवसेना- शिंदे)
९८ जालना - अर्जुन खोतकर (शिवसेना शिंदे)
९९ बदनापूर - नारायण कुचे (भाजप)
१०० भोकरदन - संतोष दानवे (भाजप)
१०१ सिल्लोड - अब्दुल सत्तार (शिवसेना शिंदे)
१०२ कन्नड - संजना जाधव (शिवसेना -शिंदे)
१०३ फुलंब्री - अनुराधा चव्हाण (भाजप)
१०४ औरंगाबाद (मध्य) - प्रदीप जैस्वाल (शिवसेना शिंदे)
१०५ औरंगाबाद (पश्चिम) - संजय शिरसाट (शिवसेना शिंदे)
१०६ औरंगाबाद (पूर्व) - अतुल सावे (भाजप)
१०७ पैठण - विलास संदीपान भुमरे (शिवसेना शिंदे)
१०८ गंगापूर - प्रशांत बंब (भाजप)
१०९ वैजापूर - रमेश बोरनारे (शिवसेना शिंदे)
११० मालेगाव (मध्य) - मुफ्ती इस्माईल (एमआयएम)
१११ मालेगाव (बाह्य) - दादा भुसे (शिवसेना शिंदे)
११२ बागलाण - दिलीप बोरसे (भाजप)

११३ कळवण नितीन पवार (एनसीपी-अजित पवार)
११४ चांदवड डॉ. राहुल अहेर (भाजप)
११५ येवला छगन भुजबळ (एनसीपी-अजित पवार)
११६ सिन्नर माणिकराव कोकाटे (एनसीपी-अजित पवार)
११७ निफाड दिलीप बनकर (एनसीपी अजित पवार)
११८ दिंडोरी नरहरी झिरवळ (एनसीपी अजित पवार)
११९ नाशिक पू. राहुल ढिकाले (भाजप)
१२० नाशिक मध्य देवयानी सुहास फरांदे (भाजप)
१२१ नाशिक पश्चिम सीमा हिरे (भाजप)
१२२ देवळाली सरोज आहिरे (एनसीपी-अजित पवार)
१२३ इगतपूरी भिका खोसकर (राष्ट्रवादी-अजित पवार)
१२४ डहाणू विनोद निकोले (माकप)
१२५ विक्रमगड हरिश्चंद्र सखाराम भोये (भाजप)
१२६ पालघर राजेंद्र गावित (शिवसेना शिंदे)
१२७ बोईसर विलास तरे (शिवसेना शिंदे)
१२८ नालासोपारा राजन नाईक (भाजप)
१२९ वसई स्नेहा दुबे (भाजप)
१३० भिवंडी ग्रा. शांताराम मोरे (शिवसेना शिंदे)
१३१ शहापूर दौलत दरोडा (एनसीपी-अजित पवार)
१३२ भिवंडी प. महेश चौघुले (भाजप)
१३३ भिवंडी पू. रईस शेख (समाजवादी पक्ष)
१३४ कल्याण प. विश्वनाथ भोईर (शिवसेना शिंदे)
१३५ मुरबाड किसन कथोरे (भाजप)
१३६ अंबरनाथ डॉ. बालाजी किणीकर (शिवसेना शिंदे)
१३७ उल्हासनगर कुमार आयलानी (भाजप)
१३८ कल्याण पूर्व सुलभा गायकवाड (भाजप)
१३९ डोंबिवली रवींद्र चव्हाण (भाजप)
१४० कल्याण ग्रा. राजेश मोरे (शिवसेना शिंदे)
१४१ मीरा भाईंदर नरेंद्र मेहता (भाजप)
१४२ ओवळा माजिवडा प्रताप सरनाईक (शिवसेना शिंदे )
१४३ कोपरी पाचपाखडी एकनाथ शिंदे (शिवसेना शिंदे गट)
१४४ ठाणे शहर संजय केळकर (भाजप)
१४५ मुंब्रा - कळवा जितेंद्र आव्हाड (एनसीपी शरद पवार गट)
१४६ ऐरोली गणेश नाईक (भाजप)
१४७ बेलापूर मंदा म्हात्रे (भाजप)
१४८ बोरिवली संजय उपाध्याय (भाजप)
१४९ दहिसर मनिषा चौधरी (भाजप)
१५० मागाठाणे प्रकाश सुर्वे (शिवसेन शिंदे गट)
१५१ मुलुंड मिहिर कोटेचा (भाजप)
१५२ विक्रोळी सुनील राऊत (शिवसेना ठाकरे)
१५३ भांडूप पश्चिम अशोक पाटील (शिवसेना शिंदे)
१५४ जोगेश्वरी पूर्व अनंत नर (शिवसेना ठाकर )
१५५ दिंडोशी सुनील प्रभू (शिवसेना ठाकरे)
१५६ कांदिवली पूर्व अतुल भातखळकर (भाजप)
१५७ चारकोप योगेश सागर (भाजप)
१५८ मालाड पश्चिम अस्लम आर. शेख (काँग्रेस)
१५९ गोरेगाव विद्या ठाकूर (भाजप)
१६० वर्सोवा हरुन खान (शिवसेना ठाकरे)
१६१ अंधेरी पश्चिम अमित साटम (भाजप)
१६२ अंधेरी पूर्व मुरजी पटेल (शिवसेना शिंदे गट)
१६३ विलेपार्ले पराग अळवणी (भाजप)
१६४ चांदिवली दिलीप लांडे (शिवसेना शिंदे)
१६५ घाटकोपर पश्चिम राम कदम (भाजप)
१६६ घाटकोपर पूर्व पराग शाह (भाजप)
१६७ मानखूर्द शिवाजीनगर अबू आझमी (समाजवादी पक्ष)
१६८ अणुशक्ती नगर सना मलिक (अजित पवार गट)
१६९ चेंबूर तुकाराम काते (शिवसेना शिंदे)
१७० कुर्ला मंगेश कुडाळकर (शिवसेना शिंदे)
१७१ कलिना संजय पोतनीस (शिवसेना ठाकरे)
१७२ वांद्रे पूर्व वरुण सरदेसाई (शिवसेना ठाकरे)
१७३ वांद्रे पश्चिम आशिष शेलार (भाजप)
१७४ धारावी डॉ. ज्योती गायकवाड (काँग्रेस)
१७५ सायन कोळीवाडा आर. तमिल सेल्वन (भाजप)
१७६ वडाळा कालिदास कोळंबकर (भाजप)
१७७ माहीम महेश सावंत (शिवसेना ठाकरे)
१७८ वरळी आदित्य ठाकरे (शिवसेना ठाकरे गट)
१७९ शिवडी अजय चौधरी (शिवसेना ठाकरे )
१८० भायखळा मनोज जामसुतकर (शिवसेना ठाकरे )
१८१ मलबाहर हिल मंगलप्रभात लोढा (भाजप)
१८२ मुंबादेवी अमिन पटेल (काँग्रेस)
१८३ कुलाबा अ‍ॅड. राहुल नार्वेकर (भाजप)
१८४ पनवेल प्रशांत ठाकूर (भाजप)
१८५ कर्जत महेंद्र थोरवे (शिवसेना शिंदे)
१८६ उरण महेश बाल्दी (भाजप)
१८७ पेण रवींद्र दगडू पाटील (भाजप)
१८८ अलिबाग महेंद्र दळवी (शिवसेना शिंदे)
१८९ श्रीवर्धन आदिती तटकरे (अजित पवार गट)
१९० महाड भरत गोगावले (शिवसेना शिंदे)
१९१ चिपळूण शेखर निकम (अजित पवार गट)
१९२ जुन्नर शरद सोनावणे (अपक्ष)
१९३ आंबेगाव दिलीप वळसे पाटील (अजित पवार गट)
१९४ खेड आळंदी बाबाजी काळे (शिवसेना ठाकरे)
१९५ शिरूर ज्ञानेश्वर कटके (अजित पवार गट)
१९६ दौंड अ‍ॅड. राहुल कुल (भाजप)
१९७ इंदापूर दत्तात्रय भरणे (अजित पवार गट)
१९८ बारामती अजित पवार (अजित पवार गट)
१९९ पुरंदर विजय शिवतारे (शिवसेना शिंदे गट)
२०० भोर शंकर मांडेकर (अजित पवार गट)
२०१ मावळ सुनील शेळके (अजित पवार गट)
२०२ चिंचवड शंकर जगताप (भाजप)
२०३ पिंपरी आण्णा बनसोडे (अजित पवार गट)
२०४ भोसरी महेश लांडगे (भाजप)
२०५ वडगाव शेरी बापु साहेब पठारे (शरद पवार गट)
२०६ शिवाजीनगर सिद्धार्थ शिरोळे (भाजप)
२०७ कोथरूड चंद्रकांत पाटील (भाजप)
२०८ खडकवासला भीमराव तापकीर (भाजप)
२०९ पर्वती माधुरी मिसाळ (भाजप)
२१० हडपसर चेतन तुपे (अजित पवार गट)
२११ पुणे कॅन्टोन्मेंट सुनील कांबळे (भाजप)
२१२ कसबा पेठ हेमंत नारायण रासने (भाजप)
२१३ अकोले किरण लहामटे (अजित पवार गट)
२१४ संगमनेर अमोल खताळ (शिवसेना शिंदे)
२१५ शिर्डी राधाकृष्ण विखे पाटील (भाजप)
२१६ कोपरगाव आशुतोष काळे (अजित पवार गट)
२१७ श्रीरामपूर हेमंग उगले (काँग्रेस)
२१८ नेवासा विठ्ठलराव लंघे पाटील (शिवसेना शिंदे)
२१९ शेवगाव मोनिका राजळे (भाजप)
२२० राहुरी शिवाजीराव कर्डिले (भाजप)
२२१ पारनेर काशिनाथ दाते (अजित पवार गट)
२२२ अहमदनगर शहर संग्राम जगताप (अजित पवार गट)
२२३ श्रीगोंदा विक्रम पाचपुते (भाजप)
२२४ कर्जत जामखेड रोहित पवार (शरद पवार गट)

२२५ नांदगाव सुहास कांदे (शिवसेना शिंदे गट)
२२६ माजलगाव प्रकाश सोळंके (राष्ट्रवादी काँग्रेस)
२२७ बीड संदीप क्षीरसागर (शरद पवार गट)
२२८ आष्टी सुरेश धस (भाजप)
२२९ केज नमिता मुंदडा (भाजप)
२३० परळी धनंजय मुंडे (अजित पवार गट)
२३१ लातूर ग्रा. रमेश कराड (भाजप)
२३२ लातूर शहर अमित देशमुख (काँग्रेस)
२३३ अहमदपूर बाबासाहेब पाटील (अजित पवार गट)
२३४ उदगीर संजय बनसोडे (अजित पवार गट)
२३५ निलंगा संभाजी पाटील निलंगेकर (भाजप)
२३६ औसा अभिमन्यू पवार (भाजप)
२३७ उमरगा प्रवीण स्वामी (शिवसेना ठाकरे)
२३८ तुळजापूर राणा जगजीतसिंह पाटील (भाजप)
२३९ उस्मानाबाद कैलास पाटील (शिवसेना ठाकरे)
२४० परांडा तानाजी सावंत (शिवसेना शिंदे)
२४१ करमाळा नारायण पाटील (शरद पवार गट)
२४२ माढा अभिजित पाटील (शरद पवार गट)
२४३ बार्शी दिलीप सोपल (शिवसेना ठाकरे)
२४४ मोहोळ राजू खरे (शरद पवार गट)
२४५ सोलापूर उत्तर विजयकुमार देशमुख (भाजप)
२४६ सोलापूर मध्य देवेंद्र राजेश कोठे (भाजप)
२४७ अक्कलकोट सचिन कल्याणशेट्टी (भाजप)
२४८ सोलापूर दक्षिण सुभाष देशमुख (भाजप)
२४९ पंढरपूर समाधान महादेव अवताडे (भाजप)
२५० सांगोला बाबासाहेब देशमुख (शेकाप)
२५१ माळशिरस उत्तमराव जानकर (शरद पवार गट)
२५२ फलटण सचिन पाटील (अजित पवार गट)
२५३ वाई मकरंद पाटील (अजित पवार गट)
२५४ कोरेगाव महेश शिंदे (शिवसेना शिंदे)
२५५ माण जयकुमार गोरे (भाजप)
२५६ कराड उत्तर मनोज घोरपडे (भाजप)
२५७ कराड दक्षिण अतुल भोसले (भाजप)
२५८ पाटण शंभूराज देसाई (शिवसेना शिंदे)
२५९ सातारा शिवेंद्रराजे भोसले (भाजप)
२६० दापोली योगेश कदम (शिवसेना शिंदे)
२६१ गुहागर भास्कर जाधव (शिवसेना ठाकरे)
२६२ रत्नागिरी उदय सामंत (शिवसेना शिंदे)
२६३ राजापूर किरण सामंत (शिवसेना शिंदे)
२६४ कणकवली नितेश राणे (भाजप)
२६५ कुडाळ निलेश राणे (शिवसेना शिंदे)
२६६ सावंतवाडी दीपक केसरकर (शिवसेना शिंदे)
२६७ चंदगड शिवाजी पाटील (अपक्ष)
२६८ राधानगरी प्रकाश आबिटकर (शिवसेना शिंदे)
२६९ कागल हसन मुश्रीफ (अजित पवार गट)
२७० कोल्हापूर द. अमल महाडिक (भाजप)
२७१ करवीर चंद्रदीप नरके (शिवसेना शिंदे)
२७२ कोल्हापूर उत्तर राजेश क्षीरसागर (शिवसेना शिंदे)
२७३ शाहूवाडी विनय कोरे (भाजप पुरस्कृत)
२७४ हातकणंगले अशोक माने (शिंदे गट पुरस्कृत)
२७५ इचलकरंजी राहुल आवाडे (भाजप)
२७६ शिरोळ राजेंद्र पाटील यड्रावकर (शिंदे गट पुरस्कृत)
२७८ मिरज सुरेश खाडे (भाजप)
२७९ सांगली सुधीर गाडगीळ (भाजप)
२८० इस्लामपूर निशिकांत पाटील (अजित पवार गट)
२८१ शिराळा सत्यजित देशमुख (भाजप)
२८२ पलुस कडेगांव डॉ. विश्वजीत कदम (काँग्रेस)
२८३ खानापूर सुहास बाबर (शिवसेना शिंदे)
२८४ तासगावं कवठे रोहित पाटील (शरद पवार गट)
२८५ जत गोपीचंद पडळकर (भाजप)
२८६ नागपूर पूर्व कृष्णा खोपडे (भाजप)
२८७ नागपूर (पश्चिम) विकास ठाकरे (काँग्रेस)
२८८ नागपूर (मध्य) प्रवीण दटके (भाजप)

## ठाकरे बंधूंनी एकत्र यावे..

मुंबई

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र यावे, यासाठी आम्ही स्वतःहून साद यापूर्वी घातली होती. आता जर त्यांनी साद घातली तर राज ठाकरे निर्णय घेतील. असे विधान मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी केले आहे. तसेच माहीममध्ये भाजपने मनसेला एकटे पाडले असा आरोप सुद्धा महाजन यांनी केला आहे.

विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाला तसेच राज ठाकरे यांच्या मनसेला चांगलाच दणका बसला आहे. त्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र यावे, अशी चर्चा सुरू झाली आहे. यावर महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

प्रकाश महाजन म्हणाले, जेव्हा स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो, जी मंडळी दुसऱ्यांच्या अस्तित्वावर प्रश्न निर्माण करत होती, त्यांचे अस्तित्व पणाला लागले तेव्हा आमची गरज त्यांना वाटते. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र यावे, यासाठी आम्ही स्वतःहून साद यापूर्वी घातली होती. आता जर त्यांनी साद घातली तर राज ठाकरे निर्णय घेतील, समोरच्याची इच्छा काय आहे हे पाहिले जाईल. राज ठाकरे तर कधीही मैत्रीचा हात समोर करतात. पण आमचा पूर्वानुभव वेगळा आहे. आम्ही सगळ्या गोष्टीला तोंड देऊ. पराभव आम्हाला नवीन नाही. त्यातून आम्ही उभारी घेऊ, असे महाजन म्हणाले.

## महायुतीतील ६ नेत्यांना विधान परिषदेची लॉटरी

मुंबई

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचा निकाल अखेर जाहीर झाला आहे. यात महायुतीला स्पष्टपणे बहुमत मिळाले आहे. तर महाविकासआघाडीचा दारुण पराभव झाला.

महायुतीने 230 जागांवर विजय मिळवला. यात भाजप 132 जागा, शिवसेना शिंदे गट 57 आणि राष्ट्रवादी अजित पवार गट 41 जागांवर आघाडीवर आहेत. तर महाविकासआघाडीला फक्त 46 जागांवर समाधान मानावे लागले आहे.

यात काँग्रेस 16 जागा, ठाकरे गट 20 जागा आणि राष्ट्रवादी शरद पवार गट 10 जागा मिळाल्या आहेत. तर अपक्ष-इतर यांना 12 जागा मिळाल्या आहेत. यामुळे राज्यात महायुतीची सत्ता येणार हे निश्चित झाले आहे. यानंतर आता सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. तर दुसरीकडे विधानसभेत डावललेल्या नाराजांना आता महायुती विधान परिषदेवर संधी देणार आहे.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने अनेक दिग्गजांना मैदानात उतरवले होते. यात विधानपरिषदेवर आमदार असलेल्या काही नेत्यांच्या नावांचाही समावेश होता. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर विधानपरिषदेवर असलेल्या आमदारांचा विजय झाला आहे. त्यामुळे विधानपरिषदेच्या ६ जागा रिक्त झाल्या आहेत. आता या रिक्त जागांवर नाराज असलेल्यांना संधी दिली जाणार आहे.

**भाजपच्या ४ जागा रिक्त**

विधानसभेच्या निकालानंतर विधानपरिषदेच्या एकूण सहा जागा रिक्त झाल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत विधानपरिषदेतील भाजपच्या ४ आमदारांची विधानसभेवर वर्णी लागली. सध्या चंद्रशेखर बावनकुळे, गोपीचंद पडळकर, रमेश कराड आणि प्रविण दटके हे विधानपरिषदेचे आमदार आहेत. हे चार नेते विधानसभेवर निवडून गेले आहेत. त्यामुळे विधानपरिषदेत भाजपच्या ४ जागा रिक्त झाल्या आहेत.

**कोणाला संधी देणार?**

तर दुसरीकडे शिवसेनेकडून आमश्या पाडवी यांचीही विधानसभेवर निवड झाली आहे. त्यामुळे शिवसेनेची एक जागा विधानपरिषदेत रिक्त झाली आहे. विधानसभा निवडणुकीत तिकीट न मिळालेल्या एका नाराजाला शांत करण्याची एकनाथ शिंदे यांना संधी आहे. तसेच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते राजेश विटेकर हे देखील विधानपरिषदेवर आमदार आहेत.

पण नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ते विजयी झाले आहेत. त्यामुळे त्यांची विधानपरिषदेची जागा रिक्त झाली आहे. यानुसार महायुतीच्या विधानपरिषदेच्या एकूण ६ जागा रिक्त झाल्या आहेत. यामुळे आता महायुतीचे तिन्ही घटकपक्ष नेमकं कोणाला संधी देणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## लाडकी बहीण योजनेमुळे आम्ही निवडून आलो...

### छगन भुजबळ यांची प्रांजळ कबुली



मुंबई

जनतेने आम्हाला कौल दिला आहे. कायद्याच्या दृष्टीने जो प्रश्न होता तो सुटला. तसंच कुठल्याही गोंधळाची परिस्थिती आता राहिलेली नाही. लोकसभा निवडणुकीनंतर जे नैराश्य आलं होतं ते दूर करण्यात देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे हे सगळे यशस्वी ठरले आहेत, लाडकी बहीण योजना सुरु केल्यानंतर वेळेवर सगळ्यांना पैसे मिळाले. अजित पवारांच्या अर्थखात्याने ती जबाबदारी घेतली होती. जे सरकार बोलतं आहे ते करतं आहे याची खात्री लाडक्या बहिणींनाही पटली, तसंच त्यांच्या घरातही ही गोष्ट पटली त्यामुळे आम्हाला चांगलं मतदान झालं असंही छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

या तिघांनी सगळ्या सहका?यांसह प्रचंड मेहनत घेतली. अजित पवार सकाळी ६ वाजल्यापासून काम करत होते. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांनीही अशीच मेहनत घेतली. तसंच लोकसभेच्या अपयशानंतर जो संभ्रम निर्माण झाला होता तो दूर करण्याचं काम या तिघांनीही केलं. आमच्या यशात लाडक्या बहिणींचा वाटा खूप मोठा आहे असंही छगन भुजबळ म्हणाले.

महिलांचं मतदानही इतर निवडणुकांपेक्षा जास्त झालं आहे. महिला जेव्हा मतदान करतात त्या घरांमधले पुरुषही एकत्रित निर्णय घेऊन मतदान घेतात. शरद पवारांनी माज्या मतदारसंघात पाडा असं म्हटलं होतं. अभ्यास करुन निर्णय घेतला होता. पण मनोज जरांगेंचं काय काय काम होतं? प्रचार संपायच्या आदल्या दिवशी हाताला सलाईन लावून माझ्याकडे पाहा, माझं काहीही होऊ शकतं आपल्या लेकरबाळांसाठी लढतोय. यांना (छगन भुजबळ) पाडा असं सगळं सांगितलं. माझ्या मतदारसंघात त्याचा परिणाम झाला. मात्र हिंदू, मुस्लिम, दलित सगळे एकवटले आणि मतदान व्यवस्थित केलं आणि मी जिंकलो असंही भुजबळ यांनी स्पष्ट केले.

## आमदार होताच संजय गायकवाडांचे टीकास्त्र

### संजय राऊतांना वेड लागल्याची बोचरी टीका





बुलढाणा

बुलढाणा विधानसभा मतदारसंघातून विजयी झालेले शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी ठाकरे गटाचे संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे. संजय राऊत यांना आम्ही गांभीर्याने घेत नाही. त्यांना आता मेंटल हॉस्पिटलमध्ये दाखल केले पाहिजे, अशा शब्दांत गायकवाड यांनी बोचरी टीका केली आहे.

संजय राऊत यांनी इव्हीएमवर शंका घेत महायुतीच्या विजायवर प्रश्न उपस्थित करत टीका केली होती. यावर संजय गायकवाड यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

संजय गायकवाड म्हणाले, इव्हीएममधून आदित्य ठाकरे हे देखील विजयी झाले आहेत. मग आता त्यावरही आक्षेप घेणार का? ठाकरे गटाचे लोकही निवडून आले आहेत ना? त्यांचा हा रडीचा डाव आहे. महायुतीला मिळालेला विजय हा कामाचा परिणाम आहे. लाडक्या बहिणीचा परिणाम आहे. तसेच महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना धूळ चारली आहे, अशी टीका गायकवाड यांनी केली.

संजय राऊत यांनी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण हे गुजराती लॉबी ठरवेल, तसेच सरकारचा शपथविधी हा गुजरातमधील स्टेडियममध्ये घ्यावा, असा खोचक सल्ला राऊत यांनी दिला होता. यावर संजय गायकवाड म्हणाले, त्या संजय राऊत यांचे कोणतेही विधान आम्ही गांभीर्याने घेत नाही. ते वेडे आहेत. त्यांची आता मेंटल हॉस्पिटलमध्ये जाण्याची वेळ आलेली आहे. तसेच आता ते आयुष्यात कधीही खासदार होणार नाहीत, असेही संजय गायकवाड म्हणाले.

महाराष्ट्रात त्यांनी शपथ घेण्यापेक्षा गुजरातमध्ये शपथविधी सोहळा घेतला तर त्यांच्या लोकांना आनंद होईल. शिवतीर्थावर शपथविधी घेतला तर छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान होईल. वानखेडे स्टेडियमवर घेतला तर 106 हुतात्म्यांचा अपमान होईल. त्यामुळे त्यांनी शपथविधीसाठी गुजरातची निवड करावी, असे संजय राऊत म्हणाले होते.

## संपादकीय

# आघाडी लढलीच नाही

लोकसभेच्या लढाईत महाराष्ट्रातील महाविकास आघाडी म्हणजेच भारतातील इंडिया अतिशय आक्रमकपणे जनतेच्या हृदयाला भिडणारे मुद्दे घेऊन लढली होती. सध्या देशाची गोष्ट जाऊ द्या. महाराष्ट्राचा विचार करूया. महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकीसाठी जे जे मुद्दे वापरले. ते ते मुद्दे त्या त्या वेळी ताजे मुद्दे होते. त्यामुळेच लोकसभेच्या वेळी महाराष्ट्रात महायुतीला जोरदार लढणाऱ्या आघाडीकडून अत्यंत अनाकलनीय पराभव पत्करावा लागला होता. या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी महायुतीने किती घोषणा, योजना आणि कार्यक्रम कार्यक्रम दिले. त्याची जंत्री आम्ही कालच दिली होती. त्यात योजना आणि घोषणांचा वर्षाव करण्यात आला. त्या वर्षावाला थांबविण्यासाठी महाविकास आघाडीला जी छत्री हवी होती. ती महाविकास आघाडीकडून जनतेसाठी दिलीच गेली नाही. त्यानंतर मग त्या योजना आणि घोषणांच्या वर्षावात महाराष्ट्रातील जनता चिंब भिजून गेली. विशेष म्हणजे राहुल गांधींसहित महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांना हे कळलेच नाही. ही सर्व मंडळी लोकसभेच्या महाविजयाच्या नशेत इतकी बुडून गेली होती की, त्यांना साधा परिणामकारक प्रचार करणेही जमले नाही. राहुल गांधी यांच्यासह ज्या ज्या नेत्यांनी प्रचार



करायचा होता. त्यांनी केवळ नकारात्मक मुद्दे हाती घेतले. संविधान वगैरेचे मुद्दे लोकसभा निवडणुकीच्या काळात एक वेळी चालले. पण महाराष्ट्राच्या सरकारने प्रत्यक्ष बहिणींच्या खात्यात साडेसात हजार रुपये जमा केले. विद्यार्थ्यांना निधी दिला. जातवार महामंडळे स्थापन केली. याविरुद्ध काँग्रेसने जो जाहीरनामा जनतेपुढे मांडला त्याची चर्चा खुद्द आघाडीवाल्यांनीही केली नाही. लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा जाहीरनामाच एनडीए साठी डोकेदुखी ठरला होता. काँग्रेसने ज्या ग्यारंट्या दिल्या होत्या. त्याआधी युती सरकारने त्या ग्यारंट्यावर ताण केली होती. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांनी महाराष्ट्राला वेळच दिला नाही. महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेतेही कधीच संपूर्ण महाराष्ट्राचे नेते नव्हते. ते आपापल्या मतदारसंघातच दंड बैठका मारत होते. त्यापैकी थोरात पडले, पृथ्वीराज चव्हाण आडवे झाले. इतर स्थानिक महत्त्वाचे नेतेही पार आपली जागा गमावून बसले. महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांच्या जवळ ना प्रभावी वक्ते होते, ना प्रभावी मुद्दे होते. विदर्भ हा आपला बालेकिल्ला आहे, असे समजून आपण जिंकलोच आहोत. अशा अविर्भावात काँग्रेसचे नेते वावरत होते. एकीकडे संघ होता संघटना होती. दुसरीकडे एकसंघता कधीच नव्हती. परस्परांवर दुगाण्या झाडणे आणि सोलापूर सारख्या शहरात उघडपणे आघाडीच्या उमेदवारला पाठिंबा न देणे. असे प्रकार बऱ्याच ठिकाणी घडले. थोडक्यात लोकसभेच्या वेळी एनडीएकडे मुद्दे नव्हते. तर आपल्या महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीत इंडिया म्हणजेच महाविकास आघाडीकडे मुद्देच नव्हते. जरांगे पाटील लाभदायी ठरतील असे ज्यांना ज्यांना वाटत होते, त्यांच्या त्यांच्या पदरी निराशाच पडली. जरांगेंचे मराठे भरभरून पावले नाहीत. मग इतरांची मते तर आपोआपच युतीकडे गेली. विधानसभा निवडणूक पूर्व काळात जाहिराती आणि प्रचारांच्या धुमधडाक्यात युतीने जी हुशारी दाखवली तिला तोड म्हणून आघाडीकडे काहीच नव्हते. मुंबईसारख्या शहरात महाराष्ट्र- गुजरात करून अमराठी मतदारांना आघाडीने स्वतःहून युतीच्या पारड्यात टाकून दिले होते. एकूणच महाराष्ट्राची ही निवडणूक दोन्हीही पक्षांना धडा देऊन गेली. या धड्याची चाहूल युतीला आधीच लागल्यामुळे त्यांनी धडाधड घोषणांचा धडाका लावला आणि बिचाऱ्या महाविकास आघाडीला पडापडीच्या आणि पाडापाडीच्या खेळात जोरात दमवून टाकले. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, आघाडीकडे तेच ते जुने चेहरे तोच तो त्यांचा गोतावळा आपापल्या निकटवर्तीयांना तिकीटे वाटता झाला. आता कितीही बोंबाबोंब केली तरी आघाडीच्या घटक पक्षाजवळ विरोधी पक्षनेताही राहणार नाही. दहा वर्षे जे लोकसभेत भोगले तोच कित्ता आता विधानसभेत आघाडीला गिरवावा लागेल. यातून शहाणपणा शिकले तर टिकले. नाही तर जनतेने फेकले आणि संपले असे होऊ शकते. आघाडीच्या शहाण्यांना अधिक उपदेश देऊन काही फायदा नाही.

## विरोधी पक्ष कमकुवत असेल तर ते लोकशाहीसाठी चांगले आहे का?

कोणत्याही लोकशाहीत ज्या पक्षाला बहुमत मिळते तोच सत्तेत असतो हे खरे आहे. पण, विजय एकतर्फी झाला तर लोकशाहीच्या दृष्टिकोनातूनही घातक आहे. निरंकुश बियाणे उगवण्याचा धोका कायम आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकालही असाच संदेश देतात. सरकारने कितीही चांगले केले (जे त्याचे कर्तव्य आहे), मतदारांनी त्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे.

कोणत्याही प्रजा तांत्रिक देशात पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यात नैसर्गिक समतोल असायला हवा. सभागृहातील पक्षाचा आकार ट्रॅक्टरच्या चाकासारखा मोठा असेल आणि विरोधी पक्षाचा आकार सायकलच्या चाकासारखा कमकुवत असेल, तर लोकशाहीच्या गाडीला गती मिळू शकत नाही. शारीरिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तीने रिंगमध्ये प्रवेश करून कुस्तीपटूला आव्हान देण्यासारखेच असेल. अशा परिस्थितीत स्वत:ला हुकूमशहा समजणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा धोका तीव्र होतो.

त्याच वर्षी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीने 234 जागा जिंकल्या, तेव्हा दहा वर्षे सरकारवर सत्ता गाजवणाऱ्या भारतीय जनता पक्षाला स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते. यापूर्वी 2019 च्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाने स्वबळावर बहुमत आणले होते, तेव्हा त्यांची विरोधकांशी असलेली वागणूक दुर्लक्षित होती. विरोधी पक्ष इतका कमकुवत आणि बटू होता की सरकारच्या संपूर्ण कार्यकाळात दांभिकपणा आणि अहंकाराची शैली फोफावत राहिली. संसदेत विरोधकांना विश्वासात घेतले गेले नाही.

राष्ट्रीय महत्त्वाच्या मुद्द्यांवर कोणतीही चर्चा झाली नाही आणि भारतासमोरील समस्यांकडे लक्ष दिले गेले नाही. महागाई असो की बेरोजगारी, भ्रष्टाचार असो की लोकशाही संवैधानिक संस्थांवरील हल्ला, या सगळ्यात विरोधकांचा आवाज खूपच क्षीण होता. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षांनीही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मातृसंस्थेबाबत विधान केले की, पक्षाला त्या संघटनेची गरज नाही. हा केवळ सत्ताधारी पक्षाचा अहंकार होता.

# भारत आणि युरोपमधील संबंधांची पुनर्रचना

24 तासांच्या अंतराने दोन युरोपीय राष्ट्रप्रमुखांनी भारत भेट देणे खूपच दुर्मिळ आहे. मात्र, जर्मनीचे चॅन्सलर ओलाफ शोल्झ यांनी 24 ते 26 ऑक्टोबरदरम्यान भारताचा तीन दिवसांचा दौरा संपवल्यानंतर लगेचच, 28 ऑक्टोबर रोजी स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेज भारतात पोहोचले आणि त्यांनी आपला द्विपक्षीय दौरा सुरू केला. ही गोष्ट दाखवते की आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे महत्त्व किती वाढले आहे.

हा चॅन्सलर शोल्झ यांचा दोन वर्षांत तिसरा भारत दौरा होता, तर स्पेनच्या राष्ट्रप्रमुखांची ही 18 वर्षांतील पहिलीच भारत भेट होती, जी २०१७ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्पेन दौऱ्यानंतर सात वर्षांनी झाली. दोन्ही नेत्यांसोबत उच्चस्तरीय मंत्री आणि व्यावसायिक शिष्टमंडळे होती.

शोल्झ आणि मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सातव्या भारत-जर्मनी आंतर-सरकारी सल्लामसलतींमध्ये व्यापार, स्थलांतर, संरक्षण, अत्यावश्यक तंत्रज्ञान आणि नवोपक्रम यांसारख्या मुद्द्यांवर 27 करार करण्यात आले. यामध्ये ग्रीन हायड्रोजन रोडमॅपसारखे नवीन उपक्रम देखील सुरू करण्यात आले. दुसरीकडे, सांचेज यांच्या दौऱ्यात आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, ज्यामध्ये गुंतवणुकीसाठी जलद प्रक्रिया, रेल्वे परिवहनातील सहकार्य अधिक मजबूत करणे आणि सांस्कृतिक आदानप्रदान कार्यक्रमांचा समावेश आहे.

शोल्झ आणि मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सातव्या भारत-जर्मनी आंतर-सरकारी सल्लामसलतींमध्ये व्यापार, स्थलांतर, संरक्षण, अत्यावश्यक तंत्रज्ञान आणि नवोपक्रम यांसारख्या मुद्द्यांवर 27 करार करण्यात आले. यामध्ये ग्रीन हायड्रोजन रोडमॅपसारखे नवीन उपक्रम देखील सुरू करण्यात आले.

**समान अजेंडा, मात्र वेगवेगळे मार्ग**

परंपरेने, भारताचे सर्वात मोठे संरक्षण करार फ्रान्ससोबत केले जात होते. तरीही, भारतासोबत संरक्षण क्षेत्रातील संबंध मजबूत करणे हे शोल्झ आणि सांचेज यांच्यादेखील प्राथमिक उद्दिष्टांमध्ये होते. जर्मनी आणि स्पेन दोन्ही देश भारताच्या आकर्षक संरक्षण बाजारपेठेचा फायदा घेण्याचा प्रयत्न करत आहेत, कारण परदेशी कंपन्यांसाठी नियम सुलभ झाले आहेत आणि स्थानिक खाजगी कंपन्यांचा सहभाग देखील संरक्षण क्षेत्रात वाढला आहे.

जर्मनीची थायसेनक्रुप आणि स्पेनची नवान्टिया भारतीय कंपन्यांसोबत सह-निर्मितीसाठी सहा पारंपारिक पाणबुड्यांच्या उत्पादनासाठी स्पर्धेत आहेत. सांचेज यांच्या वडोदरा, गुजरात येथील भेटीत एअरबस आणि टाटा एरोस्पेस कॉम्प्लेक्सचे उद्घाटन झाले. या सुविधेचे उद्दिष्ट भारतीय वायुदलासाठी 56 C-295 विमान तयार करणे आहे, ज्याची किंमत 2.5 अब्ज अमेरिकी डॉलर्स आहे, त्यापैकी 16 विमान सेविल्ले मध्ये आणि 40 वडोदरा येथे असेंब्ल केली जातील. एअरबस स्पेन आणि टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम्स यांच्यातील या भागीदारीमुळे भारतात हजारो स्थानिक नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे आणि हे "भारताने संरक्षण क्षेत्रात दिलेले सर्वात मोठे करार" म्हणून ओळखले जात आहेत. दुसरीकडे, भारताला शस्त्रास्त्रांच्या निर्यातीसाठी जर्मनीने शस्त्र निर्यात नियमांची शिथिलता, तसेच दोन्ही सैन्यदलांमध्ये परस्पर लॉजिस्टिक विनिमय करार पूर्ण करण्याच्या महत्त्वाकांक्षा हे एक गेम चेंजर ठरले आहे. युरोपीय देश भारतासाठी विश्वासार्ह सुरक्षा भागीदार म्हणून स्वतःला स्थिर करत आहेत, तसेच "मेक इन इंडिया" कार्यक्रम आणि संरक्षण उत्पादनाच्या स्वदेशीकरणाच्या उपक्रमांना चालना देत आहेत, ज्यामुळे भारताला रशियन शस्त्रास्त्रांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होईल.

दोन्ही नेत्यांच्या मार्गक्रमणांमध्ये वेगळेपण होते,



पण अजेंडे समान होते. शोल्झ दिल्ली आणि गोव्यात थांबले, तर सांचेज वडोदरा आणि मुंबईला भेट देत होते. मुंबईत सांचेज यांनी उद्योगपती नेत्यांशी आणि चित्रपट स्टुडिओंशी संवाद साधला, ज्याद्वारे स्पॅनिश चित्रपट उद्योग आणि बॉलिवूड यांच्यातील सहकार्याचा शोध घेता येईल. शोल्झ यांचा गोव्यातील थांबा भारत-जर्मनी नौदलाच्या सहकार्याला बळ देत होता, जर्मनीच्या बेडेन-व्हर्टेमबर्ग फ्रीगेटच्या पोर्ट कॉल आणि फ्रँकफर्ट ॲाम माईनने भारतीय नौदलासोबत केलेले संयुक्त सराव यामुळे ते अधिक सशक्त झाले आहेत.

युरोपीय देश भारतासाठी विश्वासार्ह सुरक्षा भागीदार म्हणून स्वतःला स्थिर करत आहेत, तसेच "मेक इन इंडिया" कार्यक्रम आणि संरक्षण उत्पादनाच्या स्वदेशीकरणाच्या उपक्रमांना चालना देत आहेत, ज्यामुळे भारताला रशियन शस्त्रास्त्रांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होईल.

युरोपच्या आर्थिक शक्तीसंपन्न असलेल्या जर्मन अर्थव्यवस्थेने अलीकडच्या काही वर्षांत अडचणींचा सामना केला आहे, 2023 मध्ये वाढीचा दर 0.3 टक्क्यांपर्यंत घसरला. दुसरीकडे, स्पॅनिश अर्थव्यवस्था—EU ची चौथ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था—साधारणपणे स्थिर राहिली आहे, युरोझोनच्या सरासरीपेक्षा जास्त वाढीचा दर आणि कमी महागाईचा दर, कारण रशियन गॅसवरील अवलंबित्व कमी आहे. भारताचे जर्मनीसोबतचे द्विपक्षीय व्यापार 2023 मध्ये 30 अब्ज अमेरिकी डॉलर्सच्या पलीकडे गेले, तर स्पेनसोबतच्या व्यापाराचा आकडा 10 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला. भविष्यातील वाढीची शक्यता ओळखून, शोल्झ आणि सांचेज यांनी EU-India मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटींना चालना देण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पुनरावृत्ती केली.

जागतिक तणाव, विशेषत: युक्रेन आणि गाझामधील युद्ध, भारताच्या दोन्ही नेत्यांशी झालेल्या चर्चांमध्ये समाविष्ट झाले. तरीही, या मुद्द्यांवर असलेल्या वेगळ्या मतांपासून त्यांचे संवाद वेगळे ठेवण्याची आणि एकत्र काम करण्याची भारताची क्षमता यामुळे भारताचे युरोपीय भागीदारांशीचे संबंध आणखी घट्ट झाले आहेत. रशिया-युक्रेन युद्धावर असलेल्या भिन्न दृष्टिकोनांच्या पार्श्वभूमीवर, भारत आणि जर्मनी यांनी मे 2022 मध्ये ग्रीन आणि सस्टेनेबल डेव्हलपमेंट पार्टनरशिपवर स्वाक्षरी केली, ज्यामुळे त्यांचे सहकार्य आणखी मजबूत झाले.

स्पेनने नवीकरणीय उर्जेच्या क्षेत्रात जी यशस्वी प्रगती केली आहे, त्याचा विचार करता, अशा प्रकारची भागीदारी भारतासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. जर्मनीने देखील आपल्या श्रमिकांची कमतरता भरून काढण्यासाठी भारतीयांसाठी व्हिसा संख्येत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे दोन देशांमधील लोकसंख्या आणि आर्थिक सहकार्याला अधिक चालना मिळू शकते.

चीन, जो भारतासाठी एक मोठं सुरक्षा आव्हान बनला आहे, त्यासंदर्भात शोल्झ आणि सांचेज यांनी युरोपीय संघाच्या आक्रमक दृष्टिकोनापेक्षा सौम्य भूमिका घेतली आहे. जर्मनीला युरोपीय संघाच्या धोरणात अनेकदा कमकुवत कडी मानले जाते, कारण ते सुरक्षा आणि इतर बाबींच्या ऐवजी बीजिंगसोबतचे व्यापार संबंध सुधारण्याला प्राधान्य देतात. दुसरीकडे, सांचेज हे 2023 च्या मार्चमध्ये शी जिनपिंग यांच्याशी भेटलेले पहिले युरोपीय नेता होते, जेव्हा जिनपिंगने मास्कोला भेट दिली होती. त्यांनी या वर्षाच्या सप्टेंबरमध्ये पुन्हा चीनला भेट दिली, युरोपीय संघ आणि चीन यांच्यातील व्यापार तणाव कमी करण्यासाठी. काही आठवड्यांपूर्वी, जर्मनीने चिनी इलेक्ट्रिक वाहनांवर टॅरिफ्सविरुद्ध मतदान केले, तर स्पेनने तेवढेच मतदान टाळले. मात्र, जर्मनी आणि स्पेनचे चीनसोबतचे व्यापार संबंध असममित आहेत—जर्मनीला 2022 मध्ये 23.18 अब्ज युरोची व्यापार तूट झाली, तर स्पेनला 34 अब्ज युरोची तूट झाली. चीनच्या अन्यायकारक व्यापार पद्धती आणि त्याच्याशी जास्त संबंध असण्याच्या जोखमीमुळे आता व्यापारावर अधिक बारकाईने विचार केला जात आहे. त्यासोबतच, भारतासारख्या इतर मोठ्या बाजारांसोबत व्यापार वाढवण्याचे प्रयत्नही जोरात सुरू आहेत.

रशिया-युक्रेन युद्धावर असलेल्या भिन्न दृष्टिकोनांच्या पार्श्वभूमीवर, भारत आणि जर्मनी यांनी मे 2022 मध्ये ग्रीन आणि सस्टेनेबल डेव्हलपमेंट पार्टनरशिपवर स्वाक्षरी केली, ज्यामुळे त्यांचे सहकार्य आणखी मजबूत झाले.

चीनच्या वाढती आक्रमकतेच्या पार्श्वभूमीवर जर्मनी आणि स्पेन दोन्ही देश एक मुक्त आणि सुरक्षित इंडो-पॅसिफिक राखण्यावर आणि या क्षेत्रात आपली उपस्थिती वाढवण्यावर लक्ष देत आहेत. यामुळे भारतासोबत त्यांची रणनीतिक भागीदारी आणखी मजबूत झाली आहे. शोल्झ भारतात आल्यानंतर, जर्मनी सरकारने "इंडियावर लक्ष केंद्रित" असे धोरणपत्र जारी केले, ज्यामध्ये भारतासोबत भविष्यातील धोरणात्मक भागीदारीसाठी एक स्पष्ट आणि महत्त्वाकांक्षी अजेंडा मांडला आहे. सांचेज यांनी देखील स्पेन सरकारचा भारतावर केंद्रित करून एक नवीन आशिया धोरण राबवण्याचा उद्देश जाहीर केला आहे.

जर्मनी आणि स्पेनमधील अंतर्गत बदलांमुळे भारतासोबतच्या संबंधांत वाढ झाली आहे. जर्मनीने पूर्वीचे Wandel durch Handel हे व्यापारी धोरण सोडून अधिक समान विचारधारे असलेल्या देशांवर त्याच्या अवलंबित्वाचे विविधीकरण करण्याचा मार्ग स्वीकारला आहे, आणि एक व्यापक Zeitenwende स्वीकारून त्याने सुरक्षा विषयक त्याच्या युद्धोत्तर संकोचाला मागे सोडले. स्पेनच्या बाबतीत, कॅटालोनियन स्वतंत्रतेचा प्रश्न, आर्थिक अडचणी आणि राजकीय अस्थिरता यामुळे त्याला इतर ठिकाणी लक्ष देण्याची वेळ नव्हती. तरीही, स्थिर अर्थव्यवस्थेच्या आधारावर, माद्रिदने अधिक सक्रिय धोरणांचा अवलंब केला आहे, आणि त्यामुळे युरोप, लॅटिन अमेरिका आणि उत्तर आफ्रिकेच्या पारंपरिक कार्यक्षेत्रांपासून बाहेर जाऊन जागतिक पातळीवर त्याचे संबंध अधिक मजबूत झाले आहेत.

सद्याच्या काळात भारताने युरोपीय देशांशी आणि त्यांच्या उपक्षेत्रांशी आपले संबंध वाढवले आहेत. त्याच वेळी, भारताची झपाट्याने वाढणारी अर्थव्यवस्था, संरक्षणातील महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे, कुशल कामकाजी वर्ग आणि मजबूत लोकशाही यामुळे भारत युरोपमधील विविध देशांसाठी एक आकर्षक भागीदार बनेल.

# भारताची इनोव्हेशन इकोसिस्टम एआयसाठी आवश्यक असलेल्या 'मेमरी सेफ्टी'वर लक्ष केंद्रित करेल का?

अलीकडेच, तीन महत्त्वाच्या भारतीय सरकारी संस्थांच्या प्रमुखांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) बद्दल धक्कादायक विधाने केली आहेत. ही विधाने खूप महत्त्वाची होती.

पहिल्या विधानात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (ISRO) अध्यक्ष एस. सोमनाथ म्हणाले की कृत्रिम बुध्दिमत्तेद्वारा अंतरिक्ष तंत्रज्ञानांत बदल होऊ घातले असून बुध्दिमत्तेचा उपयोग रॉकेट्स आणि उपग्रहाच्या रचनेत होऊ शकतो.

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना ( DRDO) चे अध्यक्ष समीर कामत यांनीही असेच मत व्यक्त केले. स्टार्ट-अप्सनी कृत्रिम बुध्दिमत्ता, रोबोटिक्स, सायबर सिक्युरिटी, मानवरहित व्यवस्था, दुहेरी वापराचे तंत्रज्ञान (ज्यामुळे शीघ्र नवीनतेपायी क्षमतेत वाढ होते) अशा सखोल तंत्रज्ञानाच्या बाबींवर ध्यान केंद्रीत करावे.

कृत्रिम बुध्दिमत्तेचा वापर ठरल्या प्रमाणे होण्याबरोबरच कृत्रिम बुध्दिमत्ता विरोधी हल्ल्याना तोंड देण्यास आपण सक्षम आहोत याची हमी दिली पाहिजे, असे धक्कादायक विधान भारतीय लष्कर प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी केले आहे.

स्टार्ट-अप्सनी(स्वावलंबी नवे प्रकल्प) कृत्रिम बुध्दिमत्ता, रोबोटिक्स, सायबर सिक्युरिटी, मानवरहित व्यवस्था, दुहेरी वापराचे तंत्रज्ञान (ज्यामुळे शीघ्र नवीनतेमुळे क्षमतेत वाढ होते) अशा सखोल तंत्रज्ञानाच्या बाबींवर ध्यान केंद्रीत करावे अशी सरकारची अपेक्षा आहे.

सध्या कृत्रिम बुध्दिमत्तेशी निगडित बरेच परवलीचे शब्द आहेत. परंतु धोरणांना आकार देणा-यांनी केलेल्या दाव्यांची ब-याचवेळा दखल घेतली जात नाही. यामुळे नाविन्यपूर्ण परिसंस्था निष्क्रिय होऊन वरील विधानांत उल्लेख केलेल्या मुद्द्यांचा विस्तार होऊ शकतो.

चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान यांनी देशाला सावध करताना एका निवेदनात म्हटले आहे की, "एआय सिस्टम केवळ अपेक्षेप्रमाणेच काम करत नाहीत तर शत्रूच्या हल्ल्यांना तोंड देऊ शकतात याची खात्री करणे महत्त्वाचे आहे.

कृत्रिम बुध्दिमत्तेच्या तीन महत्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष देण्यात आलेले नाही.

1.भारतीय अंतराळ संशोधन संस्था, संरक्षण संशोधन आणि विकास संघटना, अणुउर्जा विभाग आणि भारतीय सैन्यदल यांच्या प्रयोगशाळेत “C आणि C++” ही प्रोग्रामिंग परिभाषा सुरुच राहिल किंवा नाही याबाबत भारत सरकारने विचार केला आहे का ?

2.या प्रोग्रामिंगच्या परिभाषा राष्ट्रीय संरक्षणासाठी वापरण्यात येणा-या उपकरणांची मेमरी अबाधित ठेवतिल का ?

3. या संस्था जर प्रचलित जुन्या परिभाषांमुळे उदभवणा-या संभाव्य धोक्यांकडे लक्ष देत नसतील तर त्यांना कृत्रिम बुध्दिमतेची साधने वापरताना कृत्रिम बुध्दिमत्ता तत्परता मेमरीची सुरक्षा हमी देईल काय?

मेमरी-सुरक्षा ही काही प्रोग्रामिंग परिभाषांचा भाग असून त्या परिभाषा, अंतर्गत मेमरीवर परिणाम करणा-या सॉफ्टवेअर बग आणि इतर धोक्यांपासून सॉफ्टवेअर सिस्टमची सुरक्षा करतात. सॉफ्टवेअर बग म्हणजे संगणक सॉफ्टवेअरमधील त्रुटी ज्या क्रॅश किंवा चुकीचे आउटपुट म्हणून प्रकट होतात. मेमरी-सुरक्षेचा गुणवत्ता, सुरक्षितता आणि सिस्टम चालविण्याच्या खर्चावर परिणाम होतो. चांगली प्रोग्रामिंग परिभाषा भाषा मेमरी-सुरक्षेची हमी देत असल्यामुळे संगणक व्यवस्थेत तिला जास्त मागणी आहे.

भारतीय कृत्रिम बुध्दिमत्ता परिसंस्था, मोठ्या भाषांचे नमुने, दावे व कृत्रिम बुध्दिमत्तेवर चालणारे एप्लिकेशन्स यांचे गोडवे गात असली तरी C आणि and C++




भाषांवर चालत असलेल्या पद्धतीचे “स्विफ्ट”, “रस्ट”, आणि “गो” सारख्या कृत्रिम बुध्दिमत्ता तत्परतेच्या परिभाषेत रुपांतर अजूनही झालेले नाही.

भारताचा कृत्रिम बुध्दिमत्तेचा प्रमुख उपक्रम “IndiaAI” ची अंमलबजावणी करणा-या “इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने” (MeitY) याबाबत प्राधान्याने काहीच प्रयत्न केलेले दिसत नाहीत कारण असे प्रयत्न मंत्रालयाच्या आधारस्तंभाचे भाग नाहीत.

“युनेस्को” आणि “इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने” तयार केलेल्या तथाकथित “रेडीनेस एसेसमेंट मेथॉडोलॉजी” रिपोर्ट मध्ये मेमरी-सुरक्षेचा मुद्द्याचा एकदाही उल्लेख नाही. तयारी फक्त नैतिक मापदंडानुसार मोजली जाते. मेमरी-सुरक्षेच्या दृष्टीने पाऊले न उचलता केवळ “रेडीनेस एसेसमेंट” सारख्या उपमा देणे भारताला परवडणारे नाही. यामुळे केवळ आत्मसंतुष्टताच वाढीस लागेल.

मेमरी-सुरक्षा प्रोग्रामिंग परिभाषांचा भाग असून त्या परिभाषा, अंतर्गत मेमरीवर परिणाम करणा-या सॉफ्टवेअर बग आणि इतर धोक्यांपासून सॉफ्टवेअर सिस्टमची सुरक्षा करतात.

·कृत्रिम बुध्दिमत्ता तत्परतेवर आधारित प्रोग्रामिंग परिभाषा जागतिक सॉफ्टवेअर उद्योगासाठी मोठे पाऊल मानले जात असतानाच वारसा-परिभाषा कृत्रिम बुध्दिमत्तेच्या नव्या मापदंडा बाबत, विशेष करुन मेमरी-सुरक्षेच्या मुद्द्यावरुन, अडखळताना दिसत आहेत.

अमेरिकेच्या “सायबर सिक्युरिटी एण्ड इंन्फ्रास्ट्रक्चर सिक्युरिटी एजन्सी”ने 2023 मध्ये आपल्या अहवालात म्हटले होते की “मायक्रोसॉफ्ट” आणि “गूगल”च्या 70 टक्के सुरक्षा समस्या, मेमरी-सुरक्षेशी संबंधित आहेत कारण दोघेही C आणि C++ परिभाषांचा प्रचंड प्रमाणात उपयोग करतात. C आणि C++ भाषांवरील जन्मजात मर्यादेपायी माहिती व तंत्रज्ञान उद्योगात “बग बाउंटी प्रोग्राम” उदयास येऊन माहिती आणि तंत्रज्ञान उद्योगात कुशल सुरक्षा संशोधकांना नोक-या उपलब्ध झाल्या. हा मुद्दा भारतावर परिणाम करणारा आहे. देशाच्या धोरणात्मक मालमत्तेचा कारभार, अणुउर्जा विषयक बाबी, टेलिकॉम, सायबर आणि सरकारचे आंतरिक नेटवर्क (जाळे), पूर्णपणे मेमरी-सुरक्षित प्रोग्राम वर चालत नसेल. भारत सरकारच्या धोरणात्मक मालमत्तेचा कारभार जर सुरक्षा-रहीत मेमरी परीभाषेवर चालत असेल तर पुढे काय होईल याची कल्पना न केलेली बरी. विरोधाभासी कृत्रिम बुध्दिमता वापरुन एखादा विरोधक कोडमध्ये असलेल्या त्रुटींच्या आधारावर मालमत्तेच्या कारभाराची माहिती घेऊन मेमरी सुरक्षेवर विध्वंसक हल्ला करु शकतो. यामुळे प्रचंड प्रमाणात महत्वाच्या निर्णायक डेटाचा नाश होऊन सर्व सेवा ठप्प होऊ शकतात.

जुलै 2024 मध्ये “अमेरिकन डिफेन्स एडवान्सड रिसर्च प्रॉजेक्ट एजंन्सीने” (DARPA) वारसा-C भाषा कोडचे रुपांतर मेमरी सुरक्षित “रस्ट प्रोग्रामिंग” मध्ये करण्यासाठी ट्रॅक्टर (Translating All C to Rust) नावाचा नवीन उपक्रम सुरु केला. वारसा-C भाषा कोड, संरक्षण विभाग, ब-याचशा आस्थापना आणि जंगम मालमत्तेचा अविभाज्य भाग आहे असे मनायला हरकत नसावी. या बाबत अमेरिकेने, मेमरी सुरक्षेबाबत योग्य ती पाऊले न उचलणा-याना वेळोवेळी इशारा दिला आहे.

फेब्रुवारी 2024च्या सुरुवातीला “यूएस व्हाईट हाऊस ऑफिस ऑफ दी नॅशनल सायबर डायरेक्टर”नी एका अहवालाद्वारे असुरक्षित मेमरी, विध्वंसक सायबर हल्ल्यांचे मूळ कारण असल्याची बाब अधोरेखित केली होती. 2022 मध्ये “सायबर सिक्युरिटी इन्फॉर्मेशन शीट ऑन सॉफ्टवेअर मेमरी सेफ्टी” या “यूएस नॅशनल सिक्युरिटी एजंन्सी”ने प्रसिध्द केलेल्या अहवालात अतिमहत्वाच्या संगणक व्यवस्थेला संभाव्य धोक्यापासून वाचविण्यासाठी मेमरी-सुरक्षित परिभाषेचा उपयोग करावा असे आवाहन करण्यात आले होते.

देशाच्या धोरणात्मक मालमत्तेचा कारभार, अणुउर्जा विषयक बाबी, टेलिकॉम, सायबर आणि सरकारचे आंतरिक नेटवर्क (जाळे), पूर्णपणे मेमरी-सुरक्षित प्रोग्राम वर चालत नसेल.

केवळ अमेरिकाच नव्हे तर चीनने सुध्दा मेमरी सुरक्षेसाठी नवीन परिभाषेचा अवलंब सुरु केला आहे. “अमेझॉन”, “गूगल”, “मेटा” आणि “माइक्रोसॉफ्ट”, बरोबर चीनचा “हुवेई” प्लॅटफॉर्म, “रस्ट फाऊंडेशन” चा एकमेव आशियाई संस्थापक सदस्य आहे. अमेरिकेच्या “चिप्स एक्ट”नुसार लादलेले सध्याचे निर्बंधही परिभाषा बदलासाठी या फाऊंडेशनचा भाग होण्यापासून चिनी कंपन्यांना रोखू शकले नाहीत. “हुवेई”च्या “एसेंडएआय चिप्स”, “रस्ट” सारख्या मेमरी सुरक्षित भाषेचा उपयोग करु शकतात. क्रिप्टोकरंसीचे सह-संस्थापक “इथेरियम”, “विटालिक बुटेरीन” आणि इतर प्रोग्रामर त्यांच्या धंद्यातील सॉफ्टवेअर कोडमधील बग्ज हुडकून काढण्यासाठी कृत्रिम बुध्दिमत्ता तत्परतेचा वापर करणे एक आव्हान मानतात. इथेरियम “रस्ट” आणि “गो” या दोघांचाही उपयोग करतो.

भारतीय मुत्सदी संस्थानी मेमरी सुरक्षेसाठी “स्विफ्ट”,” “रस्ट” आणि “गो” सारख्या परिभाषांच्या विकासाची दखल घेतली की नाही, हे माहीत नाही. निर्णायक पायाभूत सेवांमध्ये देश पातळीवर मेमरी-असुरक्षित कोडचे रुपांतर मेमरी-सुरक्षित करण्यात त्यांनी पुढाकार घेतला असल्यास तशी घोषणा झाली असती किंवा त्या बाबत चर्चा झाली असती. इस्रोच्या अध्यक्षानी कांही दिवसांपूर्वी म्हटले होते की त्यांच्या अवकाश संस्थेस दर दिवशी 100 हून अधिक सायबर हल्ल्यांना तोंड द्यावे लागते. परंतु या सायबर हल्ल्याचे मूळ असुरक्षित मेमरीत आहे का ? आणि असल्यास इस्रोने असे हल्ले घालविण्यापलीकडे कोणती पाऊले उचलली हा प्रश्न उभा राहतो. जर इस्रो किंवा इतर मुत्सदी संस्था केवळ बग्ज शोधून काढणे, एका वेळी एकच समस्येला तोंड देणे अशा प्रयत्नांत जर मेमरी सुरक्षेकडे लक्ष देत नसतिल तर, विशेषत: बग्जचा संचार करणा-या विरोधी कृत्रिम बुध्दिमत्तेच्या उदयाच्या पार्श्वभूमीवर, आपल्या पायाभूत महत्वाच्या सुविधा सुरक्षित ठेवणे भारताला कठीण जाईल.

क्रिप्टोकरंसीचे सह-संस्थापक “इथेरियम”, “विटालिक बुटेरीन” आणि इतर प्रोग्रामर त्यांच्या धंद्यातील सॉफ्टवेअर कोडमधील बग्ज हुडकून काढण्यासाठी कृत्रिम बुध्दिमत्ता तत्परतेचा वापर करणे एक आव्हान मानतात.

सरकारने आपल्या सर्व संस्थांना C, C++-असुरक्षित परिभाषेवर आधारित कोडच्या जागी कृत्रिम बुध्दिमत्तेच्या स्थिर परिभाषेवर आधारित सुरक्षित कोड विकसित करावा असे कडक निर्देश दिले पाहिजेत. किंवा त्यांनी कृत्रिम बुध्दिमत्तेच्या मेमरी सुरक्षा परिभाषे प्रमाणे आपले हार्डवेअर समायोजित करावे. किंवा C, C++च्या जागी पर्यायी मेमरी विकसित करावी.

देशाच्या धोरणात्मक आराखड्याशी संबंधित राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि इतर संस्थांनी मेमरी सुरक्षेला प्राधान्य दिले नाही तर कृत्रिम बुध्दिमत्तेच्या बदल घडवून आणण्याच्या क्षमतेचा उपयोग अपूर्णच राहिल यात शंका नाही.

# वाढीव मानधन वेळेत देण्याची अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मागणी



■ मुंबई

राज्य सरकारने अंगणवाडी लोकमत न्यूज नेटवर्क सेविका व मदतनीस यांच्या मानधनात अनुक्रमे ३ हजार व २ हजारांची वाढ केल्याचा शासन निर्णय ४ ऑक्टोबर रोजी काढला. त्यानुसार ऑक्टोबरपासून मानधन वाढ होणे अपेक्षित आहे. या मानधन वाढीबाबत प्रशासकीय बाबींची पूर्तता करावी. तसेच आयसीडीसीमधील अकाऊंट विभागाकडून त्यानुसार आराखडा तयार करून प्रत्यक्ष मानधनवाढ मिळावी, अशी अपेक्षा अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

आतापर्यंत मानधनवाढीबाबत निर्णय निघाल्यानंतर दोन ते तीन महिन्यांमध्ये प्रशासकीय कागदपत्रे, तरतुदी यांची पूर्तता होते. त्यानंतर मानधनवाढ कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होते, अशी माहिती अंगणवाडी कृती समिती निमंत्रक शुभ शमीम यांनी दिली. मात्र या वेळच्या शासन निर्णयानंतर विधानसभा निवडणूक आचारसंहिता, निवडणूक आणि निकाल यामुळे प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत काम सुरू झाले नाही. त्यामुळे निकालानंतर प्रशासकीय पातळीवर कामाची सुरुवात झाली पाहिजे. तरच येणाऱ्या अधिवेशनामध्ये आर्थिक तरतुदीबाबत निर्णय होऊ शकेल, असे शमीम यांनी सांगितले.

२०१८ मध्ये केंद्रीय पातळीवर झालेली मानधनवाढ अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात १० ते ११ महिने जमा झाली नव्हती. मात्र जमा न झालेल्या मानधनवाढीचा फरक एकत्र कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा झाला होता, असे शमीम यांनी सांगितले. त्याप्रमाणे यावेळच्या मानधनवाढीचा फरक कर्मचाऱ्यांना एकत्रच मिळेल, मात्र त्याची अंमलबजावणी वेळेत व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# मालमत्ता कर न भरणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांना महानगरपालिकेकडून मालमत्ता जप्तीची नोटीस

■ मुंबई

निर्धारित कालावधीमध्ये कर भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्यातसेच आर्थिक क्षमता असूनही मालमत्ताकर न भरणाऱ्यामोठ्या थकबाकीदारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कलम २०३ अन्वये जप्तीची नोटीस बजावण्यात आली आहे. विहीत मुदतीत कर भरणा न केल्यास मुंबई महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार सदर मालमत्तेवर कलम २०४, २०५, २०६ अन्वये प्रथमतः मालमत्तेतील चीज वस्तू जप्त करुन लिलाव केला जाईल. जप्त चीज वस्तुतूनही कर वसूल झाला नाही तर, कलम २०६ अन्वये मालमत्तेचा लिलाव करण्यात येईल, असे नोटीसीद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. मालमत्ता कर हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. मालमत्ताकर देयके मिळाल्यापासून ९० दिवसांच्या आत मालमत्ता कर महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे. या कालावधीत कर न भरल्यास महानगरपालिकेकडून टप्पेनिहाय कारवाई सुरू करण्यात येते. महानगरपालिकेच्या करनिर्धारण व संकलन खात्याचे अधिकारी प्रत्यक्ष संपर्क आणि संवाद साधून मालमत्ता कर भरण्यासाठी पाठपुरावा करतात. तरीही मालमत्ता कर न भरल्यास 'डिमांड लेटर' पाठवण्यात येते. यानंतरच्या पुढच्या टप्प्यात मालमत्ता धारकास २१ दिवसांची अंतिम नोटीस दिली जाते. त्यानंतर थकबाकीदारांची मालमत्ता जप्ती, लिलाव आदी कारवाई केली जाते. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांच्या नेतृत्वाखाली आणि सहआयुक्त (कर निर्धारण व संकलन) श्री. विश्वास शंकरवार यांच्या मार्गदर्शनाखाली कर निर्धारण व संकलन खात्याच्या वतीने मुंबई शहर व उपनगरांमधील मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती तसेच आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांची कर भरणा करण्याकरीता होणारी गैरसोय टाळण्यासाठी ऑनलाईल सुविधा उपलब्ध आहे. याबाबतची माहिती महानगरपालिकेच्या https://www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कर भरणा ऑनलाईन करण्याकरीता करदात्यांनी महानगरपालिका संकेतस्थळावरील माहितीचा वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

तथापि, काही मोठ्या थकबाकीधारकांकडून अद्याप कर भरणा करण्यात येत नसल्याने आाणि त्यांना वेळोवेळी सूचना देऊनही योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने कर निर्धारण व संकलन खात्याच्या वतीने जप्तीची नोटीस बजावण्यात आल्या आहेत. दंड रकमेसह थकबाकी रकमेचा यात समावेश आहे. महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार लिलावाची कार्यवाही करण्यात येईल. यामुळे नोटीसप्राप्त मालमत्ताधारकांनी कारवाई टाळण्यासाठी तातडीने कर भरणा करावा, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

### 10 मोठ्या मालमत्ताधारकांकडे सुमारे 600 कोटी रूपयांची थकबाकी

| दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी कर भरण्यासाठी पाठपुरावा केलेल्या 'टॉप टेन' मालमत्ताधारकांची यादी- |
|---|
| १) दि रघुवंशी मिल्स् लिमिटेड (जी दक्षिण विभाग) - ११९ कोटी ५८ लाख ९८ हजार ६०० रुपये |
| २) मेसर्स ओंकार डेव्हलपर्स प्रा. लि. (जी दक्षिण विभाग) - १०४ कोटी ७८ लाख २५ हजार ७१३ रुपये |
| ३) जे. कुमार इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एच पूर्व विभाग) - ७१ कोटी ९८ लाख ०३ हजार ४४५ रूपये |
| ४) जे. कुमार इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एच पूर्व विभाग) - ६७ कोटी ५२ लाख १० हजार ५०२ रूपये |
| ५) मेसर्स स्टर्लिंग इन्वेस्टमेंट कॉर्पोरेशन लि.(जी दक्षिण विभाग) - ५५ कोटी १० लाख ५६ हजार ९५६ रुपये |
| ६) मेसर्स विमल असोसिएट्स (के पूर्व विभाग) - ४१ कोटी ७४ लाख ११ हजार २१५ रुपये |
| ७) दि रघुवंशी मिल्स् लि. (जी दक्षिण विभाग) - ३८ कोटी ४८ लाख ६७ हजार ७९५ रुपये |
| ८) प्रोव्हिनंस लॅण्ड प्रा. लि. (जी दक्षिण विभाग) - ३३ कोटी ६९ लाख ०७ हजार ७९ रुपये |
| ९) समीर एन. भोजवानी (के पश्चिम विभाग) - ३३ कोटी ३९ लाख ४५ हजार ४० रूपये |
| १०) मेसर्स श्रीराम मिल्स् लि. (जी दक्षिण विभाग) - ३३ कोटी २३ लाख ५४ हजार ९६५ रूपये |

# महिला कलाकारांचा साधना संगीत सोहळा
## गीत, संगीत, नृत्याची जुगलबंदी रंगणार

■ मुंबई

अय्यर फाउंडेशनतर्फे यंदा २३ नोव्हेंबरला 'साधना' संगीत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात बहुमोल योगदान देणाऱ्या महिला संगीतकार, वादक आणि नृत्यांगना यांच्या बहुमोल योगदानाच्या सन्मानासाठी हा सोहळा आयोजित केला जातो. त्यासाठी प्रवेश विनामूल्य आहे.

साधना सोहळ्याचे यंदाचे अकरावे वर्ष आहे. २३ नोव्हेंबरला सायंकाळी ७:०० वाजता दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानाजवळील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकातील वीर सावरकर सभागृहात हा सोहळा होणार आहे. आपापल्या कार्यक्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या महिला कलाकार यावेळी कलाकृतीचा उत्कृष्ट नजराणाही सादर करतील. संगीताच्या सुरेल मैफलीत मधुर गीत, संगीत वाद्यांच्या आवाजांनी या सोहळ्याचा आनंद घेणे सर्वांसाठी अविस्मरणीय ठरेल.

चेन्नई येथील भरतनाट्यम नृत्यांगना अरुंधती श्रीनिवासन नृत्यकला सादर करतील. कर्नाटकातील धारवाड येथील वीणा मठ व्हायोलीनवर भारतीय संगीताची चाल सहज धरतात. प्रेक्षकांना हा अनोखा नजराणा प्रत्यक्षात पाहण्याची

संधी मिळेल. गायिका दीपिका भिडे- भागवत आणि ऋतुजा लाड यांच्या सुमधुर आवाजाची जुगलबंदी या संगीत सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरेल. या सर्व कलाकारांना सिद्धार्थ मेस्ता हार्मोनियमवर, तर स्वप्नील भिसे आणि निस्सार हुसेन खान तबल्यावर साथ देतील. आतापर्यंत बासरीवादक देवप्रिया आणि सुचिस्मिता चटर्जी आणि हेलतल मेहता, संगीत अग्निहोत्री, श्रुती सडोलीकर, अपूर्वा गोखले, कलापिनी कोमकली या महिला कलाकारांनी या संगीत सोहळ्यात सहभाग नोंदवला आहे.

# मोहन जोशी यांना 'रंगकर्मी जीवनगौरव'

■ मुंबई



मराठी नाट्य कलाकार संघातर्फे दिला जाणारा 'रंगकर्मी जीवनगौरव पुरस्कार' यंदा ज्येष्ठ रंगकर्मी । मोहन जोशी यांना जाहीर झाला आहे. मराठी नाट्य कलाकार संघातर्फे आयोजित 'जागतिक रंगकर्मी दिवस' या सोहळ्यात मोहन जोशी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मराठी नाट्य कलाकार संघातर्फे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत यासंबंधीची घोषणा करण्यात आली. मराठी नाट्य कलाकार संघ ही अखिल भारतीय मराठी नाट्य

परिषदेची अधिकृत घटक संस्था असून, गेली २५ वर्षे नाट्य परिषदेच्या सहकार्याने व्यावसायिक रंगकर्मीसाठी कार्यरत आहे. मराठी रंगभूमीसाठी सर्वस्व वाहिलेल्या नटवर्य भालचंद्र पेंढारकर यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून २५ नोव्हेंबर हा दिवस २०१४ या वर्षापासून कलाकार संघातर्फे 'जागतिक रंगकर्मी दिवस' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी एका ज्येष्ठ व श्रेष्ठ रंगकर्मीचा सन्मान करण्यात येतो. आतापर्यंतच्या "जागतिक रंगकर्मी दिवस" सोहळ्यांमध्ये भालचंद्र पेंढारकर, मधुकर तोरडमल, किशोर प्रधान, शोभा प्रधान, गंगाराम गवाणकर, विक्रम गोखले, दिलीप प्रभावळकर, अशोक सराफ, उषा नाडकर्णी व रोहिणी हट्टगडी या ज्येष्ठ कलाकारांना मराठी नाट्य कलाकार संघातर्फे सन्मानित केले गेले आहे. यंदाही हा सोहळा २५ नोव्हेंबरला संध्याकाळी सहा वाजता माटुंगा येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आला आहे. यात "रंगकर्मी जीवनगौरव पुरस्कार" प्रदान सोहळ्यासह ज्ञानेश पेंढारकर यांचा सांगीतिक कार्यक्रम सादर होणार आहे. तसेच सन्मानमूर्ती मोहन जोशी यांची प्रकट मुलाखतही यावेळी होणार आहे. या कार्यक्रमाला सर्वांना विनामूल्य प्रवेश आहे, अशी माहिती मराठी नाट्य कलाकार संघातर्फे देण्यात आली. या कार्यक्रमाला सर्वांना विनामूल्य प्रवेश आहे, अशी माहिती मराठी नाट्य कलाकार संघातर्फे देण्यात आली.

# कामगार संघटनांना आयुक्तांच्या नोटिसा
## समन्वय समितीने पक्षाला पाठिंबा दिल्याने वाद

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीसाठी मतदानाच्या आदल्या दिवशी मुंबई महापालिकेतील कामगार संघटनांच्या समन्वय समितीने परिपत्रक काढून महाविकास आघाडीला पाठिंबा दर्शवल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला. शिवाय समन्वय समितीतील अन्य संघटनांनी याला संमती नसताना काढलेल्या पत्रकामुळे सगळ्याच संघटना अडचणीत आल्या आहेत. विशेष म्हणजे सर्व पदाधिकाऱ्यांच्या खोट्या स्वाक्षरी वापरण्यात आल्याचा आरोप विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. समन्वय समितीचे अध्यक्ष शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या कामगार सेनेशी संबंधित असल्याची माहिती असून, या सगळ्या पार्श्वभीवर पालिका आयुक्त तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी या सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना नोटिसा पाठवल्या आहेत.

पालिकेमध्ये विविध कर्मचारी अधिकारी संघटना कार्यरत असून, या संघटनांची एक समन्वय समिती आहे. शिवसेना (ठाकरे) पक्ष प्रणीत कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम हे या समन्वय समितीचे अध्यक्ष आहेत. या समितीने मतदानाच्या आदल्या दिवशी परिपत्रक काढून महाविकास आघाडीला पाठिंबा जाहीर केला होता. तसेच महायुतीचा पराभव करून आघाडीला प्रचंड मताने विजयी करा, असे जाहीर आवाहन केले होते. दरम्यान, पालिका अधिनियमानुसार या संघटनांना कामगारांच्या समस्या सोडवण्याचा अधिकार असतो, मात्र निवडणुकीदरम्यान कोणत्याही राजकीय पक्षाची बाजू घेण्याचा किंवा पाठिंबा देण्याचा अधिकार नाही. त्यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी समन्वय समितीमधील सर्व पदाधिकाऱ्यांना नोटिसा धाडल्या आणि २४ तासांत खुलासा करण्याचे आदेश दिले. यामुळे पालिकेतील सर्व संघटनांचे पदाधिकारी वादात सापडले असून, हे परिपत्रक अन्य पदाधिकाऱ्यांना न सांगताच परस्पर काढण्यात आल्याचा आरोप अन्य कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी केला आहे.

# नोकराने केली दोन लाखांच्या दागिन्यांची चोरी

■ मुंबई

ग्राहकाला दाखविण्यासाठी दिलेले दागिने नोकरानेच लंपास केल्याचा आरोप सराफाने केला आहे. त्याने रोख रक्कम मिळून जवळपास दोन लाख दोन हजार रुपयांचा अपहार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी त्यांच्या तक्रारीवरून चारकोप पोलिसांनी दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत. तक्रारदार संपत सेन (४७) आणि इंद्रमल जोशी (३४) यांच्या सोन्याच्या पेढीत कामाला असलेल्या कुरबान मंडल (३६) याने ग्राहकांना दागिन्यांचे डिझाइन दाखवायचे असे सांगत दागिने घेतले. मात्र, त्यानंतर तो परत आला नाही. हा प्रकार गेल्या महिन्यात घडला होता. याप्रकरणी सेन आणि जोशी यांनीही चारकोप पोलिस ठाण्यात मंगळवारी तक्रार दिल्यावर बीएनएस कायद्याचे कलम ३१६ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानुसार पोलिस आरोपीचा सध्या शोध घेत आहेत.

# चारित्र्याच्या संशयातून विवाहितेची हत्या

■ मुंबई

चारित्र्याच्या संशयातून मलबार हिल येथे विवाहितेची हत्या केल्याची घटना बुधवारी उघड झाली. याप्रकरणी हत्येचा गुन्हा नोंदवत सुमीत लक्ष्मण वेदवंशी (३०) याला अटक करण्यात आली आहे. मलबार हिलच्या कंबाला हायस्कूलजवळ शिवाजीनगर झोपडपट्टीत मंगळवारी रात्री उशिराने ही घटना घडली. योगिता सुमीत वेदवंशी (२५) असे मृत विवाहितेचे नाव असून तिची आई लक्ष्मी नाडल (४७) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पत्नीने तिचे दागिने मित्राकडे गहाण ठेवले तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेत सुमितने तिला मारहाण केली. तसेच रागात जवळील टॉवेलने गळा आवळून तिची हत्या केली, असे तपासात उघड झाले. त्यानुसार पोलिसांनी हत्येचा गुन्हा नोंदवत आरोपीला अटक केली आहे.

# रिक्षाचालकाने बेस्ट बसची काच फोडली

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

ओव्हरटेक करण्यावरून झालेल्या वादात रिक्षाचालकाने बेस्ट बसवर रॉडने हल्ला करत तोडफोड केल्याचा प्रकार मालाड पश्चिम परिसरात घडला. याप्रकरणी मालाड पोलिसांनी मंगळवारी अनोळखी रिक्षाचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मालवणी डेपोमध्ये बेस्ट बसचालक म्हणून सेवेत असलेल्या रियाज शेख (२६) यांनी याप्रकरणी तक्रार केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, १९ नोव्हेंबर रोजी ते मार्वे रोडवरून मालवणीला जात असताना आदर्श बस स्टॉपवर प्रवासी उतरवल्यानंतर त्यांच्या बससमोर एक रिक्षा येऊन थांबली. आपल्याला ओव्हरटेक करायला का दिले नाही, म्हणून रिक्षाचालकाने शेख यांना शिवीगाळ करायला सुरुवात केली. त्यानंतर मारण्याची धमकी देत रिक्षाचालकाने रिक्षामधील लोखंडी रॉडने बसच्या दरवाजाची काच फोडली. या काचेचे तुकडे शेख यांच्या चेहऱ्यावर उडून त्यांना दुखापत झाली. याप्रकरणी मालाड पोलिसांत रिक्षाचालकाविरोधात सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम कलम ३. आणि बीएनएस कायद्याचे कलम १२५ (ए), ३२४(३), ३२४ (६), ३५१ (२) व ३५२ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

# अपत्याच्या लालसेपोटी मुलीचे अपहरण करणाऱ्या लेस्बियन जोडप्याला जामीन

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

अपत्याच्या लालसेपोटी पाच वर्षाच्या मुलाचे अपहरण करणाऱ्या समलिंगी जोडप्याला उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला. आरोपींनी मुलाच्या हव्यासापोटी बेकायदेशीर मार्ग पत्करला असला तरी समलिंगी दाम्पत्याला अपत्य होणे शक्य नसल्याने त्या दाम्पत्याने तिसऱ्या आरोपीच्या मदतीने मुलीला तिच्या पालकांपासून वेगळे केले, असे स्पष्ट करत न्या. मनीष पितळे यांनी समलिंगी दाम्पत्याला जामीन मंजूर केला.उपनगरी मुंबईतील एका कुटुंबाने पाच वर्षाच्या मुलीचे अपहरण झाल्याची तक्रार मार्च २०२४ मध्ये पोलीस ठाण्यात केली. पोलिस तपासात मुलगी एका महिलेसोबत दिसली. आरोपी महिलेने मुलीला लेस्बिअन जोडप्याला विकल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांनी समलिंगी जोडप्याच्या घरातून ५ वर्षाची मुलगी ताब्यात घेतली आणि दोघांनाही अटक केली. त्यांच्या याचिकेवर न्यायमूती मनीष पितळे यांच्यासमोर सुनावणी झाली. केवळ अपत्याच्या हव्यासापोटी हा बेकायदेशीर मार्ग स्वीकारल्याचे व मुलाच्या संगोपनासाठी सहआरोपींना आर्थिक मदत केल्याचे मान्य केले. याचिकाकर्त्यांना आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करावा लागला यापेक्षा वाईट काय असू शकते. या दाम्पत्याने तिसऱ्या आरोपीच्या मदतीने मुलीला तिच्या पालकांपासून वेगळे केले. अशा दाम्पत्यांना दुर्दैवाने समाजात उपहासाला सामोरे जावे लागत आहे, असे न्यायालयाचे म्हणणे आहे.

# शिव कोळीवाडा संक्रमण शिबिर पुनर्विकासाला मुंबई उच्च न्यायालयाची मंजुरी

■ मुंबई

मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी शिव कोळीवाड्यातील पंजाबी कॅम्प संक्रमण शिबिराला पुनर्विकासाची मंजुरी दिली आहे.

मुंबई उच्च निर्णयामुळे सदर न्यायालयाच्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत स्टे मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या लखानी हाऊसिंग कॉर्पोरेशनला दणका बसला असून म्हाडाअंतर्गत पुनर्विकास करण्याचा मार्ग मोकळा झाला.

शिव कोळीवाडा संक्रमण शिबीर ११.२० एकर भागात पसरले असून गेल्या तीन वर्षांपूर्वी २५ इमारती बांधकाम ठिसूळ झाल्याने मनपा प्रशासनाकडून पाडण्यात आल्या. म्हाडाने या जागेचा विकास करावा अशी रहिवाशांची मागणी होती. मात्र १९ सोसायट्यांमध्ये एकता नसल्याने लखानी कॉर्पोरेशनने काही सोसायट्यांना हाताशी धरून पुनर्विकास करण्याचा दावा केला. फेब्रुवारी २०२४ मध्ये म्हाडाच्या सरकारी प्रस्तावाला लखानी कॉर्पोरेशनने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. ते न्यायालयाने नाकारले. मात्र, शेकडो कुटुंबांची आपल्याला परवानगी मिळाली असून, त्यासाठी करोडो रुपयांचा खर्च झाल्याचे लखानी कॉर्पोरेशनच्या वकिलांनी निदर्शनास आणून दिले. त्यावर राज्य शासनाच्या वकिलांनी इमारतीमधील कुटुंबांशी केलेला व्यवहार चुकीचा असल्याचे सांगत वैयक्तिक कब्जा करणाऱ्यांवर ते कायदेशीररित्या बंधनकारक नाही. त्यांच्यावर शिक्का मारलेला किंवा नोंदणीकृत नव्हता, असा आक्षेप घेतला. परिणामी, म्हाडाच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला.

# दोन मतदारसंघ वगळता ठाकरेंना बंडखोरी रोखण्यात यश

■ मुंबई

महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शरद पवार गटाला बंडखोरीने ग्रासले असतानाच उद्धव ठाकरे यांना मात्र बंडखोरीवर नियंत्रण आणण्यात यश आले आहे. आघाडीत ९४ जागा लढविणाऱ्या ठाकरे गटात वर्सोवा व अमरावती जिल्ह्यातील बडनेरा या दोन मतदारसंघात प्रामुख्याने बंडखोरी झाली आहे. त्यामुळे काँग्रेस व शरद पवार गटाच्या तुलनेत ठाकरे गटाचे संभाव्य नुकसान टळण्याची शक्यता आहे.

विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर महाविकास आघाडीमध्ये जागावाटपावरून पडद्यामागे मोठ्या घडामोडी झाल्या. जागावाटपावरून एकेक मतदारसंघ आपल्या पारड्यात टाकण्यासाठी आघाडीतील काँग्रेस, शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि

***वर्सोवा विधानसभा ठाकरे गटाला मिळाल्यामुळे तेथून माजी नगरसेवक राजू पेडणेकर व राजूल पटेल हे निवडणूक लढण्यास इच्छुक होते. परंतु उद्धव ठाकरे यांनी तेथून पक्षाचे उपविभागप्रमुख हारुण खान यांना उमेदवारी दिली. वर्सोवा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात मुस्लिम मतदार असल्याने आणि लोकसभा निवडणूकीत याच मतदारांच्या पाठिंब्यावर ठाकरे गटाच्या उमेदवाराला वर्सोवा विधानसभा मतदारसंघातून मोठे मताधिक्य मिळाले होते. मुस्लिम मतदारांच्या मतांचा विचार करत उद्धव ठाकरे यांनी हारुण खान यांना उमेदवारी दिली असली तरी त्यामुळे नाराज झालेले पेडणेकर यांनी बंडखोरी करत अपक्ष म्हणून रिंगणात उतरले होते. पेडणेकर यांना स्थानिक मतदारांचा पाठिंबा मिळत असला तरी मतविभाजनाचा फटका हारूण खान यांनाही बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.***

शिवसेना (उद्धव बाळसाहेब ठाकरे) यांच्यात रस्सीखेच सुरु होती. जागावाटपात ठाकरे गटाला ९४ जागा मिळाल्या. काही ठिकाणी काँग्रेस व राष्ट्रवादीला मतदारसंघ गेल्याने स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी उफाळून आली होती.

शिवडी, वर्सोवा, बडनेरा मतदारसंघात उमेदवारी न मिळाल्याने ठाकरे गटात इच्छुकांनी नाराजी व्यक्त केली होती. शिवडी मतदारसंघात लालबागचा राजा मंडळाचे मानद सचिव सुधीर साळवी यांच्यासह विद्यमान आमदार अजय चौधरी यांच्यात उमेदवारीवरुन नाराजीनाट्य रंगले होते. परंतु, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी साळवी यांची नाराजी दूर करत त्यांना शांत केले. त्यानंतर पक्षफुटीदरम्यान पक्षासोबत राहिलेले अजय चौधरी यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले.

ठाकरे गटाला फटका बसण्याची शक्यता अमरावती जिल्ह्यातील बडनेरा मतदारसंघात ठाकरे गटाकडून प्रिती बंड यांना उमेदवारी मिळणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, ऐनवेळी सुनील खराटे यांना उमेदवारी मिळाल्याने बंड नाराज होऊन बंडखोरी केली आणि त्यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या मैदानात उतरल्या. प्रिती बंड यांच्या उमेदवारीमुळे ठाकरे गटाच्या मतदारांमध्ये फूट पडून त्याचा फटका ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार खराटे यांना बसण्याची शक्यता आहे. तर मत विभागणीमुळे याचा थेट लाभ भाजपाच्या पाठिंब्यावर मैदानात उतरलेले राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टीचे उमेदवार रवी राणा यांना होण्याची शक्यता आहे.

# दहावीच्या गणित, विज्ञान उत्तीर्ण निकषात बदल नाही

■ मुंबई

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च महिन्यात घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेत गणित आणि विज्ञान या विषयांकरिता उत्तीर्णतेचे निकष पूर्वीसारखेच आहेत. यामध्ये कोणताही बदल केलेला नाही. ज्यावर्षी या निकषात बदल होतील त्यावेळी मंडळामार्फत स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल, याची नोंद सर्व शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक व अन्य संबंधीत घटक यांनी घ्यावी, अशा सूचना राज्य मंडळाकडून देण्यात आल्या आहेत. राज्य आराखड्यातील अभ्यासक्रम तरतुदीनुसार विद्यार्थ्यांना दहावीच्या बोर्डाच्या परी क्षेत गणित आणि विज्ञान या विषयांमध्ये ३५ पेक्षा कमी आणि २० पेक्षा जास्त गुण मिळाले, तरी असा विद्यार्थी पुढील शिक्षण घेऊ शकणार आहे. त्याच्यासमोर परीक्षा पुन्हा देणे किंवा एका विशिष्ट शेऱ्यासह दहावीचे प्रमाणपत्र घेऊन अकरावीसाठी प्रवेश घेणे, असे दोन पर्याय असणार आहे. ज्यांना विज्ञान किंवा गणितातील अभ्यासक्रम पुढे करायचे नाहीत अशांसाठी हा निर्णय फायदेशीर ठरणार होता. या निर्णयाची मात्र यंदा अंमलबजाणी होण्याची शक्यता कमी असल्याचे दिसून येत आहे. हा निर्णयाबाबत शिक्षण विभागाने स्पष्टीकरण दिले आहे. अद्याप तरी गणित आणि विज्ञान या विषयांकरिता उत्तीर्णतेचे निकष मंडळाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणेच असणार आहेत, असे सांगण्यात आले आहे. याबाबत राज्य अभ्यासक्रमात तरतूद करण्यात आली असून राज्य सरकारने नियुक्त केलेल्या सुकाणू समितीने त्याला मान्यता दिली आहे. यंदाच्या परीक्षेत त्यानुसार कोणताही बदल करण्यात येणार नाही.

# 55 व्या 'इफ्फी' मध्ये पहिल्या पॅनल चर्चेमध्ये महिला सुरक्षा आणि चित्रपट यावर प्रामुख्याने भर

■ मुंबई

गोवा इथे सुरू असलेल्या 55व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये (इफ्फी) पहिली पॅनल चर्चा आज महिला सुरक्षा आणि चित्रपट या विषयावरील संभाषणाने झाली. या संवाद कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध अभिनेत्री आणि निर्माती वाणी त्रिपाठी टिकू यांनी केले. या सत्राने चित्रपट निर्माते इम्तियाज अली, अभिनेत्री सुहासिनी मणिरत्नम, खुशबू सुंदर आणि भूमी पेडणेकर या पॅनेलच्या सदस्यांना एकत्र आणले. चित्रपट उद्योगातील महिलांची सुरक्षा, लिंग प्रतिनिधित्व आदी महत्त्वाच्या मुद्द्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली. या क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिला करतात, तुयाचबरोबर त्यांच्या सिनेमातील भूमिका सामाजिक मूल्यांना आकार देण्याचे काम करतात, असे पॅनल मधील वक्त्यांनी चर्चेत सांगितले.



ऑन-स्क्रीन म्हणजे, प्रत्यक्ष पडद्यावर आणि पडद्यामागेही चित्रपट उद्योग महिलांना अधिक चांगले समर्थन देवून सशक्त कसे करू शकतो , याबद्दल पॅनेलच्या सदस्यांनी वैयक्तिक अनुभव आणि अंतर्दृष्टी सामायिक केली. चित्रपटसृष्टीतील महिला छळ किंवा शोषणाची चिंता न करता मोकळेपणाने काम करू शकतील असे सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

वाईट कृत्य करणाऱ्या एखाद्याची ओळख पटल्यास चित्रपटाच्या सेटवर कसा प्रतिसाद दिला गेला पाहिजे, यावर महत्त्वपूर्ण चर्चा यावेळी झाली. पॅनेलच्या सदस्यांनी मान्य केले की, कामाच्या ठिकाणी लैंगिक अन्याय सहन करणे यापुढे स्वीकारार्ह असणार नाही. पुरुष कलाकार सेटवर अनेकदा कसे येतात आणि सीनमध्ये बदल सुचवतात, ही प्रथा महिलांसोबत क्वचितच घडते याचा अनुभव सुहासिनी मणिरत्नम यांनी सामायिक केला. महिलांनी देखील त्यांच्या कामाच्या 'सीन' ची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, हे अधोरेखित करून सुहासिनी म्हणाल्या, प्रतिनिधित्व करताना त्यांचा निष्क्रीय सहभाग असू नये, त्याऐवजी चर्चा करायला हवी. त्या पुढे म्हणाल्या की, क्षेत्रात प्रवेश करण्यापूर्वी उद्योग व्यावसायिकांनी कामाची नैतिक मूल्ये समजून घेणे महत्त्वाचे आहे.

इम्तियाज अली यांनी अशी कार्यसंस्कृती निर्माण करण्याच्या महत्त्वावर भर दिला, जिथे सेटवर असलेल्या महिला त्यांच्याशी कोण कसे वर्तन करतील, याची चिंता न करता केवळ कलेवर लक्ष केंद्रित करू शकल्या पाहिजेत. चित्रपट निर्माते सेटवर होणारा लैंगिक अन्याय सहन करू शकत नाहीत, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या चर्चेत चित्रपटांमधील महिलांचे चित्रण आणि त्यांच्यासाठी सुरक्षित अवकाश निर्माण करण्यावर त्याचा थेट प्रभाव कसा पडतो, यावरही चर्चा झाली. अभिनेत्री भूमी पेडणेकर यांनी उत्कटतेने यावर आपली मत मांडली. तुया म्हणाल्या, महिलांची प्रतिष्ठा आणि पडद्यावर त्यांचे प्रतिनिधित्व करण्याची पद्धत आदरयुक्त आणि सशक्त वातावरण निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. अभिनेत्री खुशबू सुंदर यावेळी म्हणाल्या की, चित्रपट मनोरंजक बनविण्यासाठी लक्ष केंद्रित करत असताना, आपण जबाबदारीने काम करतो. इथे कामामध्ये समानता आणि आदराच्या तत्त्वांशी तडजोड होणार नाही याची खात्रीही करून घेतो. पॅनेलमधील सर्व सदस्यांनी एकमताने मान्य केले की, महिलांचे सन्मानाने चित्रण करणे हे केवळ पात्रांबद्दल नाही तर मोठ्या प्रमाणावर उद्योगासाठी एक आदर्श निर्माण करणे आहे.

या चर्चेत प्रेक्षकांचा देखील सक्रिय सहभाग दिसला. सिनेमातील महिलांच्या भूमिकेत होत असलेली उत्क्रांती आणि त्यांच्या सुरक्षिततेशी किंवा प्रतिष्ठेशी तडजोड न करता या उद्योगामध्ये त्यांना यशस्वी होण्यासाठी एक विशिष्ट स्थान कसे निर्माण करून देवू शकतो, याविषयी प्रश्न प्रेक्षकांनी उपस्थित केले.

इफ्फी 2024 मधील ही पहिली पॅनल चर्चा असल्यामुळे , या संभाषणाने या महोत्सवासाठी अशी वातावरण निर्मिती केली आहे जी न केवळ सिनेमाच्या कलेचाच उत्सव साजरा करत नाही तर सर्वांसाठी सुरक्षित, अधिक समावेशक भविष्य घडवण्याच्या उद्योगाच्या जबाबदारीचे समीक्षण या चर्चेद्वारे करण्यात आले.

# फिनोलेक्स इंडस्ट्रीजची धानोरकर यांच्याकडे धुरा

■ मुंबई

फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या संचालक मंडळाने सौरभ धानोरकर यांची व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यास मंजुरी दिली आहे. ही नियुक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी आली असून ती गुरुवारपासून लागू झाली आहे. २० नोव्हेंबरला व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यकाळ संपुष्टात आलेल्या अजित वेंकटरमन यांची ते जागा घेतील. धानोरकर १९८३ पासून विविध भूमिकांद्वारे कंपनीशी संलग्न असून २०१६ मध्ये निवृत्त होईपर्यंत ते व्यवस्थापकीय संचालकपदी कार्यरत होते.

# ठंड में चाहिए Dry skin से छुटकारा तो इस तरीके से लगाएं चेहरे पर Coconut oil, फिर देखिए कैसे निखरती है त्वचा



ठंड में रूखी-सूखी त्वचा के कारण चेहरे की चमक गायब हो जाती है. जिसके कारण आपको हमेशा अपने चेहरे को 24 घंटे मॉइश्चराइज करके रखना पड़ता है. नहीं तो स्किन खींची-खींची रहती है. आज हम इस लेख में नारियल तेल के बारे में बात करेंगे जो ठंड में आपको ड्राई स्किन से छुटकारा दिलाएंगे. तो चलिए जानते हैं कितने तरीके से इस तेल को चेहरे पर लगा सकती हैं.

नारियल तेल के फायदे चेहरे के लिए

